# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

**सोमवार, दिनांक २९ मे, २०२३ / ज्येष्ठ ८, १९४५ (शके)**

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**६४.** सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम सत्रातील एकूण ३८८ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी २८ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती एकूण प्रलंबित ३६० निवेदनांपैकी १६२ निवेदने मा. सदस्यांना पत्रक भाग - २ अन्वये दिनांक सोमवार, दिनांक १५ मे, २०२३ रोजी वितरीत करण्यात आली. आता एकूण १९८ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १९ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : **२९ मे, २०२३**

**जितेंद्र भोळे**
सचिव-१ (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)
४. अनुवाद कक्ष
५. प्रतिवेदन शाखा

सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

# महाराष्ट्र विधानसभा लक्षवेधी सूचना क्र.१७१

**श्री. लहू कानडे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १७१ पुढीलप्रमाणे आहे :-**

"अनुसुचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी केंद्र व राज्य शासनाकडून संयुक्तपणे भारत सरकार शिष्यवृत्ती देण्यात येत असणे, ही शिष्यवृत्ती महाडीबीटीच्या संकेतस्थळावरून शिष्यवृत्तीचे ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असणे, शिष्यवृत्तीचे नवीन अर्ज भरण्यासाठी अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना वेळोवेळी मुदत वाढ देण्यात येणे, मात्र मात्र सन २०२२ / २३ च्या मध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध सवर्गाचे आतापर्यंत राज्यातून २ लाख ९० हजाराजचे ऑनलाईन नोंदणी झालेली असणे , त्यापैकी समाज कल्याण विभागाकडे प्राप्त झालेले १ लाख ४२००० अर्ज मंजूर करण्यात येणे मात्र १ लाख ते २० हजार अर्ज महाविद्यालयाकडे प्रलंबित असल्याची धक्कादायक बाब दिनांक १ फेब्रुवारी २०२३ रोजी वा त्या सुमारास उघडकीस येणे, विशेष म्हणजे समाज कल्याण विभागाने वारंवार याबाबत सूचना करूनही काही महाविद्यालयाने जाणीवपूर्वक याकडे दुर्लक्ष केल्याचे समोर येणे, मोठ्या प्रमाणावर अर्ज प्रलंबित ठेवणाऱ्या महाविद्यालयांना संबंधित जिल्हाधिकाऱ्याकडून नोटीस बजावून महाविद्यालयाचे मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव शासनाला सादर करण्यात येणार असल्याचे सामाजिक न्याय विभागाचे विभागाचे सचिव आणि आयुक्त यांनी याबाबत आढावा घेतल्याचे समोर येणे, याबाबत शासनाने विद्यार्थ्यांच्या नुकसान करणाऱ्या महाविद्यालया विरोधात करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया".

---

## श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री, यांचे निवेदन

**राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता मॅट्रीकोत्तर उच्च शिक्षण घेता येण्याकरीता राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांमार्फत विविध शिष्यवृत्ती योजना राबविण्यांत येतात. यामध्ये प्रामुख्याने केंद्र शासन पुरस्कृत भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना व राज्य शासनाची शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क योजनेचा समावेश आहे.**

**सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र शासनाच्या सर्व प्रकारच्या शिष्यवृत्तीसाठी महाडीबीटी (Mahadbt) पोर्टल दि. ०१.१०.२०१८ पासून नव्याने कार्यान्वीत झाले असून https://mahadbt.maharashtra.gov.in या संकेत स्थळाचा वापर करून अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तींच्या विविध योजनांकरिता विद्यार्थ्यांनी आपले ऑनलाईन अर्ज नोंदणीकृत केले जातात. सदर अर्ज संबंधित महाविदयालयाकडून तपासून व पडताळणी करून संबंधीत जिल्हयातील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग यांचेकडे मान्यतेस्तव सादर करण्यात येतात. महाविदयालयाकडून प्राप्त झालेल्या अर्जांवर संबंधीत जिल्हातील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेकडून ऑनलाईन मान्यता देण्यात येते व त्यानंतर मान्यता झालेल्या अर्जांचे ऑनलाईन देयक तयार करुन ते कोषागारात सादर केले जाते. कोषागारातून सदर देयके मंजूर झाल्यानंतर मान्य झालेल्या अर्जांची शिष्यवृत्तीच्या रक्कमेची सत्र निहाय (First and Second Installment) PFMS प्रणालीद्वारे महाविद्यालय व विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक अदायगी करण्यात येते.**

**चालू शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन नोंदणीकृत करण्याकरीता राज्य शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवर दि. २१ सप्टेंबर २०२२ पासून सुविधा**

उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. याबाबत पोर्टलवरील योजनेची अंमलबजावणी बाबत आयुक्तालयाचे पत्र क्रमांक ३५७३ दि २३.९.२०२२ नुसार सर्व प्रादेशिक उपायुक्त व सर्व सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांना लेखी सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

सद्यस्थितीत दि. २७ फेब्रुवारी २०२३ च्या महाडीबीटी पोर्टलवरील अहवालानुसार भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत चालू शैक्षणिक वर्षात सन २०२२-२३ मध्ये अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे मागिल वर्षाच्या तुलनेत सुमारे ७८% एवढे पात्र अर्ज नोंदणीकृत झालेले आहेत. त्यानुसार चालू शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे ३,२९,५३२ नोंदणीकृत पात्र अर्जापैकी विद्यार्थी स्तरावर त्रुटीपुर्तते करिता २१,८४१ अर्ज तसेच महाविद्यालय स्तरावर एकूण ७७,७७५ अर्ज मंजुरीकरिता प्रलंबित आहेत.

चालू शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे ३,२९,५३२ नोंदणीकृत पात्र अर्जापैकी २,२९,९१६ अर्ज महाविद्यालयाने मंजुर केले असून त्यापैकी २,२४,०३४ अर्ज संबंधीत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयामार्फत मंजूर करण्यांत आलेले आहेत. त्यापैकी राज्य हिश्याचे (४०%) १,८४,४४४ विद्यार्थ्यांचे रक्कम रु.२१९.५० कोटी इतक्या रक्कमेचे देयक कोषागारात सादर करण्यात आलेले आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही चालू आहे.

या व्यतीरिक्त शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये १००% ऑनलाईन अर्ज नोंदणीकृत होण्याकरिता व महाविद्यालय व जिल्हास्तरावरील प्रलंबित अर्ज निकाली काढण्याबाबत शासनाने दिलेल्या निर्देशानुसार आयुक्तालयाचे पत्र क्रमांक १७२ दि २०.१.२०२३ नुसार दर आठवडयाला सर्व जिल्ह्यातील सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांना व्हिडीओ कॉन्फरन्सव्दारे आढावा घेवून सर्व क्षेत्रीय कार्यालयांना सुचना देण्यात येतात. त्याचबरोबर शासनस्तरावरून देखील वेळोवेळी व्हिडीओ कॉन्फरन्सव्दारे आढावा घेण्यात येत आहे.

महाविद्यालयांकडून करण्यात येणारी ऑनलाईन अर्ज तपासणी व पडताळणी या प्रक्रियेस अधिक गती येण्याकरीता विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व जिल्हयातील सहाय्यक आयुक्त तसेच महाविद्यालयातील प्रलंबित अर्जसंख्येबाबत महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या बैठका, विद्यार्थी पालक संघटनांची व्हिडीओ कॉन्फरन्स, महाविद्यालयातील कर्मचा-यांची कार्यशाळा इत्यादी उपक्रम राबविण्यांत येत आहेत. त्याच प्रमाणे शासन निर्णय ८ जानेवारी २०१९ नुसार संबंधीत महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमाची शुल्क मंजुरीची जबाबदारी सक्षम शैक्षणिक विभाग (उदा. उच्च व तंत्र शिक्षण संचालनालय, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, शिक्षण शुल्क समिती, राज्यातील सर्व विद्यापिठे इ.) / शासकीय यंत्रणेकडून करावयाची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची असल्याने त्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याबाबत आयुक्तालयाचे पत्र क्रमांक २१ दि.४.१.२०२३ अन्वये सर्व प्रादेशिक व सर्व सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांचे स्तरावरून त्यांना लेखी सूचना देणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील कोणताही विद्यार्थी शिष्यवृत्तीपासुन वंचित राहणार नाही याची काळजी विभागामार्फत घेण्यात येत आहे.

---

सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

## महाराष्ट्र विधानसभा लक्षवेधी सूचना क्र.११४६

**डॉ. नितिन राऊत, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. सुरेश वरपुडकर, श्री. अमित विलासराव देशमुख, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. विकास ठाकरे, श्रीमती सुलभा खोडके, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), प्रा. वर्षा गायकवाड, श्री. संजय जगताप, श्री. धिरज देशमुख, श्री.बळवंत वानखडे, श्री. अशोकराव चव्हाण, श्री. जितेश अंतापूरकर, श्री. मोहनराव हंबर्डे, श्री. माधवराव पवार, श्री. राजेश एकडे, श्री. अमिन पटेल, श्री. अस्लम शेख, श्री. सुनिल केदार, श्री. विजय वडेट्टीवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ११४६ पुढीलप्रमाणे आहे :-**

"अनुसूचित जातीच्या मुलामुलींना उच्च शिक्षणाची संधी मिळावी म्हणून पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्तीचे सुधारित धोरण केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाने एप्रिल, २०१८ आणि मार्च, २०२१ मध्ये जाहिर करणे, डीम्ड विद्यापीठ व खाजगी विद्यापीठांनाही हे धोरण लागू असणे, मा. उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयानेही यापूर्वीच आदेश देणे, परंतु राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागाने धोरण लागू करुन तसे शासन आदेश काढले नसल्यामुळे अनुसूचित जातीतील शिष्यवृत्ती पात्र, तसेच फी माफी पात्र मुलामुलींना डीम्ड विद्यापीठ व खाजगी विद्यापीठ लाभ देत नसणे, सामाजिक न्याय विभागास अनुसूचित जातीच्या लोकसंख्येप्रमाणे वार्षिक तरतूद अर्थसंकल्पात करणे आवश्यक असून आतापर्यंत जवळपास ३० हजार कोटी अखर्चित निधी लॅप्स होणे, त्यामुळे अनुसूचित जातीचे पात्र लाभार्थी विकास योजनेपासून वंचित राहत असल्याने परिणामी अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन डीम्ड विद्यापीठ व खाजगी विद्यापीठांमध्ये अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना, उमेदवारांना शिष्यवृत्तीच्या सुधारित धोरणाप्रमाणे लाभ मिळण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया.".

---

श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री, यांचे निवेदन

**केंद्रपुरस्कृत भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना ही राज्यात सन १९५९-६० या शैक्षणिक वर्षापासून अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्याकरीता राबविण्यात येत आहे. सदर योजना राज्य शासन, केंद्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात राबवत आहे.**

**सदर योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून राज्य शासनास देण्यात येणाऱ्या केंद्रीय अनुदानाच्या सुत्रामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यांत आलेल्या आहेत. सन २०१६-१७ पर्यंत केंद्र शासनाकडून राज्य शासनास "राज्य शासनाच्या बांधील खर्चानुसार" केंद्रीय अनुदान अदा करण्यात येत होते. यामध्ये प्रत्येक पंचवार्षिक योजनेच्या शेवटच्या वर्षातील एकूण खर्चाची रक्कम पुढील पंचवार्षिक योजनेकरीता राज्याचा बांधील खर्च म्हणून घोषित करण्यांत येत होता.**

**तदनंतर सन २०१७-१८ ते २०१९-२० या दरम्यान उपरोक्त सुत्रामध्ये बदल करुन राज्य शासनाच्या मागील पाच वर्षातील कोणत्याही वर्षातील जास्तीत जास्त मागणी गृहीत धरुन तेवढया रक्कमेचा हिस्सा राज्य शासनाचा बांधील खर्च म्हणून निश्चित करण्यांत आला होता. मात्र सन २०१८ मध्ये केंद्र शासनाव्दारे निर्गमीत सुधारीत नियमावलीतील निधी वाटपाच्या सुत्रानुसार राज्य शासनावर मोठया प्रमाणात आर्थिक भार पडत असल्याचे निदर्शनास आल्याने उपरोक्त सुत्र तात्काळ खंडीत करुन केंद्र व राज्य हिस्सा निश्चित स्वरुपाने वितरीत करणेबाबत केंद्र शासनास राज्य शासन तसेच समाज कल्याण आयुक्तालय यांचेमार्फत वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला आहे.**

महाराष्ट्र शासन तसेच इतर राज्यांनी केंद्र शासनास याबाबतीत वेळोवेळी केलेल्या पाठपुराव्यास प्रतिसाद म्हणुन माहे मार्च, २०२१ मध्ये केंद्र शासनाने सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित्त केलेल्या आहेत. केंद्र शासनाच्या सदर सुधारीत मार्गदर्शक सूचनांमधील निधी वितरणाशी संबंधित मुद्द्या पुरता मर्यादीत शासन निर्णय दिनांक १७.३.२०२२ रोजी सामाजिक न्याय विभागामार्फत निर्गमीत करण्यात आलेला असून त्यान्वये भारत सरकार पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत केंद्र-राज्य हिश्श्याचे केंद्र (६०%) राज्य (४०%) सूत्र स्विकारण्यात आले आहे व त्याचबरोबर केंद्र शासनाच्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांमधील शिष्यवृत्तीच्या वितरण प्रणालीस देखील मान्यता देवून ती स्विकारण्यात आलेली आहे.

सदर योजनेच्या सुधारीत मार्गदर्शक सुचना राज्यामध्ये लागू करण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभाग तसेच माहिती व तंत्रज्ञान विभागाचे अभिप्रायासह प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आलेला आहे.

राज्यातील अभिमत विद्यापीठातील आर्थीक व सामाजिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना शासनाची शिष्यवृत्ती योजना लागू करण्याबाबत श्री बापू सुपडू थोरात यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका ६९/२०११ दाखल केली होती. सदर याचिकेवरील मा.उच्च न्यायालयाने शासनाच्या विरोधात दि.२० मार्च,२०१५ रोजी निर्णय दिल्याने, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने मा.उच्च न्यायालयाच्या सदर आदेशाविरोधात मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र.२०२०७/२०१५ दाखल केली होती. प्रस्तुत न्यायालयीन प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.११.२०१९ रोजी आदेश पारीत करुन मा.उच्च न्यायालयाचे आदेश कायम केले आहेत.

उपरोक्त नमुद जनहित याचिका ६९/२०११ श्री बापु सुपडु थोरात विरूध्द महाराष्ट्र शासन संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक २० मार्च,२०१५ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने राज्यातील अभिमत विद्यापीठातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्तीचे सुत्र विहित करण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दिनांक ७.१२.२०२१ च्या शासन निर्णयान्वये माजी न्यायाधीश श्री एम.एन.गिलानी यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय तज्ञ समितीचे गठन केले होते. सदर समितीने दिनांक २७.१२.२०२१ च्या पत्रान्वये दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने उच्च व तंत्रशिक्षण विभागाने राज्यातील अभिमत विद्यापीठातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकरीता शासनाची प्रचलीत शिष्यवृत्ती प्रतिपूर्ती योजना लागु करण्याबाबतचा शासन निर्णय मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेने दिनांक २३.२.२०२३ रोजी निर्गमित केलेला आहे. सदर शासन निर्णयातील तरतूदी सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाच्या अधिनस्त लाभार्थ्यांना लागू करण्याची बाब विचाराधिन आहे.

त्याचबरोबर नमुद करण्यात येते कि, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाकडुन अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील वैयक्तीक लाभाच्या विविध योजना राबविण्यात येतात. तसेच इतर विभागांच्या वैयक्तीक लाभार्थ्यांच्या योजनेला अनुसूचित जाती व नवबौध्द लाभार्थ्यांसाठी अनुसूचित जाती घटक योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करून देण्यात येतो. मात्र निधी खर्च करताना पात्र लाभार्थ्यांनाच लाभ दिला जाणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक विहीत प्रक्रिया राबविताना निधी खर्च करताना मर्यादा येतात सबब प्रत्येक आर्थिक वर्षात संपुर्ण अर्थसंकल्पित निधी खर्च होत नाही.

---

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

## महाराष्ट्र विधानसभा लक्षवेधी सूचना क्र.११४७

**डॉ. नितिन राऊत, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. सुरेश वरपुडकर, श्री. अमित विलासराव देशमुख, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. विकास ठाकरे, श्रीमती सुलभा खोडके, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), प्रा. वर्षा गायकवाड, श्री. संजय जगताप, श्री. धिरज देशमुख, श्री. बळवंत वानखडे, श्री. अशोकराव चव्हाण, श्री. जितेश अंतापूरकर, श्री. मोहनराव हंबर्डे, श्री. माधवराव पवार, श्री. राजेश एकडे, श्री. अमिन पटेल, श्री. अस्लम शेख, श्री. सुनिल केदार, श्री. विजय वडेट्टीवार विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ११४७ पुढीलप्रमाणे आहे :-**

" राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागातर्फे मागासवर्गीय समाजासाठी विविध योजना राबविल्या जात असून अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घ्यावे, या समाजातील विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणाची संधी मिळावी, योग्य व हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणे, परदेश शिष्यवृत्ती साठी विद्यार्थ्यांची संख्या सन २०१७-१८ पासुन ७५ इतके असुन या संख्येत वाढ करुन २०० करण्याबाबत दि. १२ ऑगस्ट, २०२१ रोजी, सामाजिक न्याय मंत्री यांनी मंजूर करणे, परंतू अद्यापनही शिष्यवृत्तीच्या संख्येत वाढ करण्यात आलेली नसणे, त्यामुळे राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थी व पालकवर्गात निर्माण झालेली तीव्र असंतोषाची भावना याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द परदेशी शिष्यवृत्तीमध्ये २०० पर्यत विद्यार्थ्यांच्या संख्येमध्ये वाढ करण्याबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया "

---

## श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री, यांचे निवेदन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील मुलांना परदेशात उच्च शिक्षणाची संधी मिळावी व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळावा म्हणून दिनांक ११ जून २००३ च्या शासन निर्णयान्वये राज्यात राजर्षि शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आलेली आहे. परदेश शिष्यवृत्तीची लाभार्थी संख्या ही योजना सुरु झाली तेव्हा १० अशी होती. या योजनेची सर्वकष एकत्रित नियमावली दिनांक २७ जून,२०१७ च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आली असून, शासन निर्णय दिनांक ३.६.२०१८ अन्वये सदर योजनेच्या लाभार्थ्यांच्या संख्येत वाढ करून ती ७५ निर्धारीत करण्यात आलेली आहे.

सदर नियमावलीअंतर्गत देण्यात येणा-या काही लाभाच्या संदर्भात व इतर मुद्याच्या अनुषंगाने विद्यार्थी, पालक व विविध लोकप्रतीनीधी व संघटनेनी केलेली मागणी व काळाची गरज विचारात घेता त्यातील काही अटी शर्तीमध्ये दिनांक २४ सप्टेंबर,२०२०, १० मार्च,२०२१, १६ मार्च,२०२१ व दिनांक १७ जानेवारी, २०२२ च्या शासन निर्णय / परिपत्रक / ज्ञापनान्वये सुधारणा करण्यात येवून प्रतीक्षाधीन यादीची निर्मीती, Post study Work Visa तसेच प्रवासभाड्याची रक्कम आगाऊ स्वरूपात देण्यात येत आहे.

सन २०२२-२३ मधील सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागांतर्गत राजर्षि शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजनेची  निवड प्रक्रिया पुर्ण होवून ७५ विद्यार्थ्यांची परदेश शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात आलेली आहे.  तसेच ३८ विद्यार्थ्यांची प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

त्याचबरोबर नमुद करण्यात येते कि, मा. मंत्री (सा.न्या) यांनी दिनांक ०५.०८.२०२१ रोजी अनुसूचित जातीच्या मुलामुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी राजर्षी शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजनेत सुधारणा करणे (जागा वाढ) या विषयासंदर्भात आयोजीत बैठकीत सदर योजनेअंतर्गत ५० जागा वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिलेले होते, त्यानुषंगाने सदर योजनेअंतर्गत ५० वाढीव जागेचा प्रस्ताव विभागामार्फत मा. मंत्रीमंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला होता. परंतू सदरील प्रस्ताव वित्त विभागाने अमान्य केलेला असून त्यास मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांची मान्यता असल्याचे विभागास अवगत केलेले आहे.

दरम्यान मा. आ. श्री अमोल मिटकरी, विधान परिषद सदस्य, मा.श्री सुनील माने, चिटणीस, पुणे शहर, भारतीय जनता पार्टी यांनी मा. मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनांचे अनुषंगाने अनुसूचित जाती प्रवर्गातील मुलामुलींकरीता राजर्षि शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत विद्यार्थी संख्येत वाढ करण्याबाबतचे सदरील प्रकरण / प्रस्ताव विभागामार्फत फेरसादर करण्यात येत आहे.

**मागील काही वर्षातील सदर योजनेचा लाभार्थी व खर्चाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.**

**(Scholarship to the Scheduled Caste Students for Aboard Studies. (2225-3832))**

| अ.क्र. | वित्तीय वर्ष | प्राप्त निधी (रू.लाखात) | एकुण खर्च (रू.लाखात) | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २०१७-१८ | ५५००.०० | २६०३.३१ | १५२ |
| २ | २०१८-१९ | ५४९९.९९ | ३२००.०० | १५२ |
| ३ | २०१९-२० | ५०००.०० | ३५००.०० | १८१ |
| ४ | २०२०-२१ | २४००.०० | २४००.०० | १३९ |
| ५ | २०२१-२२ | ५३००.०० | ५३००.०० | २१० |
| ६ | २०२२-२३ (अर्थसंकल्पीत) | १५००.०० | ४३०८.०० | १७४ (१५०+२४) |

*************************************

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री.राजु पारवे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१७६८ पुढीलप्रमाणे आहे:-**

**"परिट, धोबी अनु. क्रमांक १२५ व वरठी अनु. क्रमांक १६६ वर असल्याने धोबी समाजातील नागरिकांना शैक्षणिक, वैयक्तिक कामात वेळोवेळी अडथळा निर्माण होत आहे. कित्येक शाळकरी मुलांच्या व मुलींच्या कास्ट व्हॅलीडीटी न निघाल्याने ॲडमिशन झालेल्या नाहीत. तसेच बऱ्याच नागरिकांच्या नोकरीसाठी सुध्दा अडचणी निर्माण झाल्या आहेत. शासनाने सुध्दा दोन्ही जाती ह्रया एकच आहे हे सुध्दा आयोगाला सुनावणीत सांगण्यात आले आहे. ६७ समाजबांधवाचे दाखले कुणाच्या आजोबाचे वरठी मुला मुलीची, नातवांची धोबी, कुणाची परिट कुणाची वरठी हे आयोगापुढे सादर करण्यात आले आहे. सदर धोबी समाजांची कास्ट व्हॅलीडीटीची अडचण लक्षात घेता त्यांना अनु. क्रमांक १२५ किंवा अनु. क्रमांक १६६ या दोन पैकी एकाच क्रमांकावर धोबी समाजाची कास्ट व्हॅलीडीटी काढण्यात यावी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."**

## मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० अंतर्गत महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२, मधील तरतूदींनुसार जात प्रमाणपत्र व त्याच्या पडताळणीचे नियमन केले जाते.

जात प्रमाणपत्र प्राप्त करतांना अर्जदार यांना त्यांचे कुटुंबाचे मानीव दिनांकाचे वेळी ज्या जिल्हयातील त्यांचे कुटुंबाचे जाती व वास्तव्याचे पुरावे आहेत. त्याच ठिकाणचे सक्षम प्राधिकारी यांचेकडून जात प्रमाणपत्र प्राप्त करणे नियम ५(१) नुसार आवश्यक आहे. जात प्रमाणपत्र पडताळणी करतांना अर्जदार यांचे प्रकरणातील जातीचा सर्वात जुना पुरावा हा मुख्य पुरावा म्हणून विचारात घेवून त्या जातीचे जात प्रमाणपत्र वैध ठरवून जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित केले जाते. त्यामुळे अर्जदार यांनी जात प्रमाणपत्र काढतांना त्यांचे आजोबा, पंजोबा ज्या जातीचे आहेत त्याच जातीचे जात प्रमाणपत्र काढणे आवश्यक आहे, असे केल्यास अर्जदारास जात प्रमाणपत्र काढतांना व जात वैधता प्रमाणपत्र मिळवितांना अडचण निर्माण होणार नाही. सर्व जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या अर्जदाराने सादर केलेल्या जातीच्या पुराव्यांच्या आधारे विहीत

प्रक्रिया राबवून वैधता प्रमाणपत्र देत आहेत. विदयार्थ्यांना वैधता प्रमाणपत्र अभावी प्रवेश न होणे व नोकरीसाठी अडचणी निर्माण होणे याबाबतच्या उपरोक्त जात प्रवर्गातील विदयार्थ्यांच्या तक्रारी आढळून आलेल्या नाहीत.

शिक्षण व समाज कल्याण विभाग, शासन निर्णय, दिनांक १३ ऑक्टोबर १९६७ नुसार महाराष्ट्र राज्याच्या इतर मागासवर्ग यादीत अनु.क्र.१२५ वर परीट किंवा धोबी, तर अनु.क्र.१६६ वर वर्थी या समुहाची नोंद समाविष्ट केलेली आहे. महाराष्ट्र शासनाच्या इतर मागासप्रवर्गातील जातीच्या यादीत अनुक्रमांक १२५ वर नमुद असलेली धोबी, परीट व अनुक्रमांक १६६ वर नमुद असलेली वरठी जात एकाच क्रमांकावर नमुद करण्याबाबत महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगास निवेदन प्राप्त झाले आहे. महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाने शासनास सादर केलेल्या अहवाल क्र.७ ( प्रकरण क्रमांक ५९/९७) मध्ये केलेल्या शिफारशीनुसार विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभाग, शासन निर्णय, दि.०१ जानेवारी, २००१ अन्वये इतर मागासवर्ग यादीत अनुक्रमांक १२५ वर "तेलगू मडेलवार (परीट)" ही जात समाविष्ट केलेली आहे. सामाजिक न्याय विभाग, दि.०१ सप्टेंबर, २०१२ रोजीच्या शुध्दीपत्रकान्वये इतर मागासवर्ग यादीत अनुक्रमांक १६६ येथे वर्थी ऐवजी वरठी असे वाचण्यात यावे, असे आदेश निर्गमित केले आहेत.

महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या नागपूर विभागीय उपसमितीकडून उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने दि.१५.११.२०२२ रोजी सामाजिक न्याय भवन, नागपूर येथे सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणी वेळी समाजाच्या प्रतिनिधींकडून कागदपत्रे व संदर्भ पुस्तकातील माहिती उपसमितीस सादर करण्यात आली. सदर मागणीबाबत उपसमिती सदस्यांकडून त्यांचे निष्कर्ष / अभिप्राय आयोगास प्राप्त झाल्यानंतर आयोगाकडून त्याबाबतचा अंतिम अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या इतर मागासप्रवर्गातील जातीच्या यादीत अनुक्रमांक १२५ वर नमुद असलेली धोबी, परीट व अनु. क्रमांक १६६ वर नमुद असलेली वरठी जात एकाच क्रमांकावर नमुद करण्यात यावे किंवा कसे याबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

******

लक्षवेधी सूचना क्र.२०३५

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**अॅड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री.जितेश अंतापूरकर, श्री.विजय वडेट्टीवार, श्री.सुनिल केदार, श्री.अस्लम शेख, श्री.बळवंत वानखडे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२०३५ पुढीलप्रमाणे आहे:-**

**"राज्याच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे जातवैधता प्रमाणपत्र पडताळणीचे संकेतस्थळ माहे जानेवारी, २०२३ पासून बंद असल्याचे निदर्शनास आले असणे, कास्ट व्हॅलिटिडी संबंधित अर्ज स्वीकारणे, पोचपावती देणे, त्रुटींची पूर्तता करणे, जातवैधता प्रमाणपत्र ऑनलाईन देणे ही कामे पुणे येथील एका एजन्सीकडे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने सोपविली असणे, विद्यार्थी व नागरिक वा राजकीय व्यक्तींना कास्ट व्हॅलिटिडी मिळविणे सुकर व्हावे यासाठी ऑनलाईन प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असणे, मात्र राज्यभरात मागील महिन्याभरापासून कास्ट व्हॅलिडिटीचे संकेतस्थळ बंद असल्याने अनुसूचित जाती, ओबीसी, व्हीजेएनटी, मराठा, एसबीसी प्रवर्गातील उमेदवारांना कास्ट व्हॅलिटिडी साठी भटकंती करावी लागत असल्याने त्यांच्यामध्ये निर्माण झालेली असंतोष, चिडीची भावना लक्षात घेता शासनाने करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच शासनाची प्रतिक्रिया."**

## मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातींचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० अंतर्गत महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातींचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२, मधील तरतूदींनुसार जात प्रमाणपत्र व त्याच्या पडताळणीचे नियमन केले जाते. नागरिकांना जात वैधता प्रमाणपत्र सुलभतेने मिळण्यासाठी जात प्रमाणपत्र पडताळणीच्या ऑनलाईन प्रक्रियेची (e-Validity) कार्यप्रणाली विकसित केलेली असून दि.०१.०८.२०२० पासून जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज प्रक्रिया ऑनलाईन करण्यात आलेली आहे.

CERT-In (India's Computer Emergency Response Team), Ministry of Electronics and Information Technology (MeitY) India यांनी दि.१६.०२.२०२३ रोजी ई-मेलद्वारे जात प्रमाणपत्र पडताळणी माहिती प्रणाली-२ साठी वापरण्यात येणारे संकेतस्थळ Hack झाल्याचे कळविले. त्यामुळे, सुरक्षिततेच्या कारणामुळे महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभाग (DIT-Directorate Information Technology) यांचेद्वारे दि.१६.०२.२०२३ रोजी maharashtra.gov.in हा domain ID बंद करण्यात आला.

जात प्रमाणपत्र पडताळणी माहिती प्रणाली-२ साठी कार्यरत Server Team व Developer Team यांनी संकेतस्थळाचे निरिक्षण व मूल्यमापन करुन जात प्रमाणपत्र पडताळणी माहिती प्रणाली-२ च्या Coding व Server Hosting मध्ये बदल करून दि.१८.०२.२०२३ रोजी Server सुरु करण्यात आले. तथापि, माहिती तंत्रज्ञान विभाग (DIT- Directorate Information Technology) यांच्या मार्गदर्शनानुसार महाराष्ट्र शासनाच्या IT धोरणानुसार जात प्रमाणपत्र पडताळणी माहिती प्रणाली-२ चे Security Audit करणे अत्यंत गरजेचे असल्यामुळे Security Audit झाल्यानंतर दि.०३.०३.२०२३ पासून समिती स्तरावर कामकाम करण्यासाठी संकेतस्थळ सुरु करण्यात आले तसेच समिती स्तरावरून प्रकरणे तपासून वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुरु झाली. दि.०६.०३.२०२३ पासून जात प्रमाणपत्र पडताळणी माहिती प्रणाली-२ संकेतस्थळ bartievalidity.maharashtra.gov.in सर्व अर्जदारांसाठी सुरु करण्यात आले आहे.

******

लक्षवेधी सूचना क्र. २२६८

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

**श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २२६८ खालीलप्रमाणे आहे :-**

"भिवंडी महानगरपालिकेतील शिवाजी चौक येथील सन १९९१ रस्तारुंदीकरणमध्ये तोडलेल्या गाळ्यांचे महानगरपालिकेची जमिन भिवंडी सर्व्हे क्र. १०२ व सर्व्हे क्र. ७३ मध्ये ३४ गाळयांचे सन १९९१ च्या नगरपालिका महासभेच्या कायदेशीर ठरावानुसार पुनर्वसन करण्यात येणे, लगतचे सर्व्हे क्रं. १०१ मध्ये टोलेजंग इमारत बांधण्यासाठी विकासकाला अडथळा निर्माण होऊ नये म्हणुन महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची विकासकावर मेहरनजर असुन त्यामुळे येथील ३४ गाळ्यांना बांधकाम तोडावयाची नोटीस न देता परस्पर गाळेधारकांचे बांधकाम निष्कासीत करून गाळेधारकांना देशोधडीला लावणे, गेल्या ३ वर्षापासुन बेरोजगार बनून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आणलेली असणे, आता त्यापैकी १४ गाळेधारकांनी सर्व्हे क्र. १०२ व सव्हे क्र. ७३ मध्ये जागा उपलब्ध करून दिली असुन जमिनधारक शिवकुमार गुप्ता यांची गेल्या ३२ वर्षा पासुन गाळेधारकांच्या विरुध्द कुठलीही हरकत नसल्यामुळे गाळेधारक हे गेले ३२ वर्षापासून सर्व्हे क्र. ७३ मध्ये दिवाणी न्यायाच्या कायद्याने ॲडव्हर्स पजेशनने कब्जेदार असणे, तसेच भिवंवडीत एकही टॅक्सि परमिट नसुन आरक्षण जागेत कुठल्या विकासकाच्या फायद्यासाठी महानगरपालिकेच्या खर्चाने वाहनतळ बांधुन देण्यात येत नसणे, याची उच्चस्तरीय चौकशी होणे गरजेचे असणे, विकास आरखड्याप्रमाणे महापालिकेच्या डिपीरोडमध्ये कुंपण व वाहनतळ बनवण्यात येत असते तर गाळ्यांची जागा असलेले रहिवासी जागेमध्ये जाणुनबुजून रस्ता बनवण्यात आलेला असणे, हा सर्व खटाटोप महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी एका व्यक्तीसाठी गैरव्यवहारातुन गैरलाभ मिळवण्याच्या दृष्टीकोनातुन करण्यात आलेला असणे, सदर सर्व्हे क्र. १०२ व ७३ ही जागा मोकळी असल्याचे छायाचित्रणासह दि. १७/११/२०२२ व दि. २४/२/२०२३ रोजी प्रधान सचिव, नगरविकास विभाग व भिवंडी महापालिका यांना निवेदन दिलेले असुन भिवंडी महापालिकेने मागील अधिवेशनात विकासकाच्या फायदयासाठी जाणुनबुजून चुकीचे उत्तर दिले असल्यामुळे व सदर गाळेधारकाची मोक्याची जागा हडपुन विकासकास फायदा करून दिला असणे, त्यामुळे शासनाने या भ्रष्ट अधिकाऱ्यांची चौकशी करून राहिलेल्या मोकळ्या जागेत देशोधडीला व उपासमारीस आलेल्या या १४ गाळेधारकांना त्याचठिकाणी पुनर्वसन करुन देण्यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाने करावयाची कार्यवाही शासनाची प्रतिक्रिया."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिकेतील शिवाजी चौक येथील सन १९९१-९२ साली रस्ता रुंदीकरणामध्ये तोडलेल्या गाळ्यांचे पुनर्वसन करण्यात आले व नंतर नोटीस न देता गाळे बेकायदेशीररित्या तोडण्यात आले असता १४ गाळे धारकांना त्याठिकाणी पुनर्वसित करण्याकरिता श्री.रामु भोईर व इतर गाळेधारकांनी भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिकेकडे निवेदन सादर केले आहे ही वस्तुस्थिती आहे. तथापि, उपरोक्त निवेदनात नमुद सम विषयाच्या अनुषंगाने सन २०२२ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्राप्त झालेल्या अतारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने आयुक्त, भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिका यांच्या वस्तुस्थितीदर्शक अहवालानुसार उत्तर विधीमंडळास सादर करण्यात आले आहे.

शेरा - एच - ०२४७(७५०-५-२०२३)

सदर प्रकरणी आयुक्त, भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिका यांनी कळविल्यानुसार भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग समिती क्र. ५ कार्यक्षेत्रातील शिवाजी चौक ते कांबा रोड, स्मशान भुमीजवळ, सि.स.नं. ३२८० लगतच्या शिवाजी चौक परिसरात तत्कालीन नगरपालिकेने सन १९९१-९२ साली रस्ता रुंदीकरणात बाधित होणाऱ्या नागरिकांना दिनांक १७.०३.१९९२ व दिनांक १२.१०.१९९८ च्या महासभेच्या ठरावान्वये एकूण ३५ गाळयांचे पुनर्वसन करण्यात आले होते. तथापि, सदर पुनर्वसित केलेल्या गाळेधारकांपैकी केवळ ०७ गाळेधारक मनपाकडे कर भरत होते. सदर जागा तक्रारीत उल्लेखित १४ गाळेधारकांच्या मालकीची नव्हती व सदर ठिकाणी तत्कालीन नगरपरिषदेमार्फत तात्पुरते पुनर्वसन करण्यात आले होते.

सदर जागेवर प्रत्यक्षात असलेल्या ७३ गाळे धारकांना बांधकाम परवानगी / मालकी हक्कांचे कागदपत्र सादर करण्याकरिता दिनांक २३.०१.२०२० रोजी पत्र देण्यात आले होते. तद्नंतर सदर जागेवर असलेले गाळे दिनांक २७.०१.२०२० रोजी निष्कासित करण्यात आले आहेत. तथापि, भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार निष्कासीत केलेले दुकान गाळे हे भोगवटादारांच्या मालकीच्या जागेवर नसल्याने, सदरचे क्षेत्र सि. स. नं. ३२८६ रस्त्याखालील असल्याने तसेच अनेक भोगवटाधारक यांचेकडे कायदेशीर हक्क शाबित करण्यासाठी पुरेसे कागदपत्र नसल्याने निष्कासनाची कारवाई केली आहे. सदर प्रकरणी कायदेशीर प्रक्रिया अवलंबिण्यात न आल्याने तत्कालीन शहरविकास अधिकारी व प्रभाग अधिकारी यांना निलंबित करण्यात आले होते व याप्रकरणी त्यांची विभागीय चौकशी अंतिम टप्प्यात आहे. भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिकेने निष्कासित केलेले दुकाने, गाळे ज्या जागेवर स्थित होते ती जागा मौजे भिवंडी सर्वे नं. ७३, १०२ येथे सदर जागेचा मालकी हक्क श्री.शिवकुमार गुप्ता यांचे नावे ७/१२ उताऱ्यावर असल्याचे दिसून येते. मात्र उक्त ७/१२ उताऱ्यावर स.न.१०२ या जमिनीच्या इतर अधिकारांमध्ये महानगरपालिकेच्या नावाची नोंद आहे असे महानगरपालिकेने कळविले आहे.

दरम्यान मौजे भिवंडी येथील सर्वे नं. १०१ सि.स.न. ३२८० ही जागा खाजगी मालकीची आहे. उपरोक्त जागेवर मंजुर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार सर्व समावेशक आरक्षक पध्दतीने आरक्षण विकसित करण्याचे मंजुर असून बांधकाम परवानगी प्रस्तावांना सन २०१७ मध्ये बांधकाम परवानगी व सन २०२१ मध्ये सुधारीत बांधकाम परवानगी दिल्याची बाब भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविली आहे. तसेच मंजुर बांधकाम परवानगीपैकी तळघर अंशत: तळमजला व अंशत: पहिला मजला यास अंशत: इमारत वापर दाखला दिनांक २९.१०.२०२१ रोजी देण्यात आला आहे. सदर आरक्षणामधील महानगरपालिकेकडे हस्तांतरण करावयाच्या वाहनतळाच्या बांधीव क्षेत्रापोटी २५४६.६१ चौ.मी. क्षेत्र महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी निष्कासित करण्यात आलेल्या १४ गाळेधारकांच्या निवेदनाच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या स्तरावर कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. सद्यस्थितीत सदर जागेवर रस्ता विकसित करण्यात आला असून सदर गाळाधारकांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन करणे शक्य नाही. सदर गाळे धारकांना कागदपत्र सादर करणेबाबत महानगरपालिका स्तरावरुन पत्र देण्यात आली असून त्यापैकी नियमानुसार पात्र ठरणाऱ्या गाळेधारकांना अन्य जागी पुनर्वसित करण्याचे प्रस्तावित असल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे.

****

महाराष्ट्र विधानसभा

नगर विकास विभाग | लक्षवेधी सूचना

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. शिरीष चौधरी, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. २६२ विकसित करण्यासाठी बीओटी तत्वावर वर्धमान फंटासी या खाजगी विकासकास ३० वर्ष मुदतीसाठी देणे, सदर विकासकाने मंजूर नकाशानुसार आरक्षण विकसित न करणे, मनपाने कंत्राट रद्द केले असताना न्यायालयाची स्थगिती असताना सदर जागेत मंजूर नकाशापेक्षा जास्त अनधिकृत बांधकामे जशी लग्नाचे हॉल, व्यायामशाळा, हॉटेलचे बांधकाम करणे, संपुर्ण जागेचा वाणिज्य स्वरूपाचा वापर करणे, करारनामा प्रमाणे महापालिकेस जागेचे भाडे न देणे, संपुर्ण जागेचा दुरूपयोग करून नागरीकांना सुविधा पासून वंचित ठेवणे, मा. न्यायालय व लवादाचा कोणतीही स्थगिती नसताना अनधिकृत बांधकामे न तोडणे महापालिकेमार्फत जागेचा दुरूपयोग करण्यास मज्जाव करणेची कार्यवाही न करणे याबाबत शासनाने त्वरीत सदर अनधिकृत बांधकामे निष्कासित करून सदर खाजगी विकासकावर एम आर टी अंतर्गत गुन्हा दाखल करून करावयाची कडक कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेत आरक्षण क्र.२६२ 'टाऊनपार्क' करिता आरक्षित आहे. सदर आरक्षण, 'बांधा, वापरा व हस्तांतर करा' या तत्वावर विकसित करण्यास महासभा ठराव क्र.२१, दि.१८.०५.२००६ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सदर जागेचे एकूण क्षेत्र ४४८००.०० चौ.मी. एवढे असून, त्यापैकी ३८०८०.०० चौ.मी. क्षेत्र 'ए' भूखंड व ६७२०.०० चौ.मी. 'बी' भूखंड अशी विभागणी करण्यात आलेली आहे. सदरचे काम बीओटी तत्वावर विकसित करणेकामी निविदा सूचना दि. २०.०४.२००७ रोजीच्या दै. महाराष्ट्र टाईम्स व टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आली. सदर निविदामध्ये दोन्ही भूखंडाच्या वापराबाबतचा अंतर्भाव करण्यात आला असून, सदर टाऊनपार्कमधील जागा विकसित करणे, तसेच, Entrance plaza, Parking Area, Security cabin, Amusement park, Landscape garden, Boating club. Restaurant (coffee house) Toilets blocks, mini train, Amphi theatre, Open party hall इ. कामांचा सामावेश करण्यात आलेला होता.

स्थायी समिती सभा ठराव क्र.४५, दि. ०५.०६.२००७ अन्वये विकासक मे. वर्धमान डेव्हलपर्स लि. यांची रु.४५,४५,०००/- प्रती वर्षी भाडे व तद्नंतर प्रत्येक पाच वर्षानंतर १०% वाढीव रक्कम भाडे महानगरपालिकेस देण्याची निविदा मंजूर करण्यात आली. तदनंतर विकासक मे. वर्धमान डेव्हलपर्स लि. यांच्यासोबत दि.२२.०६.२००७ रोजी करारनामा करून ३० वर्षे BOT (भाडेपट्टा तत्वावर) भाड्याने देण्यात आली. सदर कामाचे दि.२६.०६.२००७ रोजी कार्यादेश देण्यात आले.

आरक्षण क्र. २६२ टाऊनपार्क, मौजे गोडदेव, नवघर येथील बांधकाम नकाशांना नगररचना विभागाने दि.०३.१०.२००८ अन्वये मंजूरी दिलेली आहे. तद्नंतर सदर नकाशांना दि.३०.१०.२००९ रोजी व पुन्हा दि. २२.१०.२०१० अन्वये भूखंड 'ए' व भूखंड 'बी' नकाशांना सुधारीत मंजुरी देण्यात आली. मंजूर नकाशात भूखंड 'ए' व भूखंड 'बी' असून, भूखंड 'ए' हा विकासकाने सोईसुविधा म्हणून विकसित केलेला आहे व भूखंड 'बी' हा विकासकास वाणिज्य वापराकरीता दिलेला आहे. सदरील आरक्षण क्र. २६२ टाऊनपार्क मधील मंजूर रेखांकन नकाशातील भूखंड 'ए' च्या बांधकामास काम पूर्णत्वाचा दाखला दिलेला आहे. तद्नंतर भूखंड 'ए' च्या पूर्ण झालेल्या बांधकामास भाग भोगवटा दाखला (Part) Completion / Occupation Certificate) दि.०९.११.२०१० रोजी देण्यात आलेला आहे. सदर टाऊनपार्कचे दि.०१.११.२०१० रोजी उद्घाटन करण्यात आले असून, नागरिकांकरीता वापरण्यास खुले करण्यात आलेले आहे.

भूखंड 'बी' चे नकाशे मंजूर करण्यात आले असून, क्लब हाऊस करीता आरक्षित आहे. सदर भूखंड विकसित करणेकामी महानगरपालिकेने वारंवार विकासकासोबत पत्रव्यवहार, तसेच, पाठपुरावा केला. तथापि, सदर भूखंड 'बी' क्लब हाऊस विकासकाने अद्यापपर्यंत विकसित केलेला नाही. सदर टाउनपार्कची थकीत भाडे न भरणे, शासनाकडील आवश्यक त्या परवानग्या न घेणे, खंड 'बी' चे काम सुरु न करणे, टाउनपार्क परिसर दैनंदिन साफसफाई न करणे, स्वच्छता न ठेवणे, मंजुर नकाशा व्यतिरिक्त नियमबाह्य वाढीव केलेले काम काढून टाकणे आवश्यक बाबीची पूर्तता करणेबाबत विकासकास वेळोवेळी कळविण्यात आलेले होते.

तथापी, सदर कामाबाबत करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार विकासकाने पुर्तता न केल्याने सदरचा करारनामा महानगरपालिकेने दि.२८.०७.२०१६ रोजी रद्द केला आहे. सदर कामाबाबत विकासक व महानगरपालिकेचा वाद निर्माण होवून सदरचा वाद सोडविण्यासाठी मा. निवृत्त न्यायाधीश, उच्च न्यायालय यांची एक सदस्यीय लवाद म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर प्रकरण मा. लवाद यांच्याकडे अद्याप प्रलंबित आहे.

टाऊनपार्क कामाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, दि.१०.०८.२०२२ रोजी जागेवर पाहणी करण्यात आली. सदर पाहणीत भूखंड 'ए' व 'बी' च्या जागेत मंजूर नकाशा व्यतिरिक्त, तसेच, महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता विकासकाने वाढीव बांधकाम करून व्यवसाय सुरु केले असल्याचे, निदर्शनास आले आहे.

सदर जागेची पाहणी केली असता, स्पोर्ट नेशन, डीवाईन मेन्स ॲण्ड लेडीज ऐसेसरीज, शूटींग बूकींग मॅनेजमेंट ऑफीस, 'डी' ट्रान्सफॉर्मेशन स्टुडीओ (जीम), फन ब्लास्ट (विविध) प्रकारचे गेम), विविध कार्यक्रमासाठी मंडप तयार करण्यात आलेला आहे, लेक व्ह्यू या नावाने हॉटेल व्यवसाय सुरु करण्यात आलेला आहे. तसेच, SE STEAM ENGINE बाहुबली पानशॉप, हजूरी कुल्फी दुकान, समर्थ गणेश आर्ट, सिद्धी गणेश आर्ट (गणपती तयार करण्याचा कारखाना), लॉन ऑफीस, गोडाऊन इ. वाढीव व अनधिकृत बांधकाम करुन नव्याने व्यवसाय सुरु केले असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच, SE STEAM ENGINE या बांधकामाच्या पाठीमागील ९०% मी x २० मी. या जागेत चार चाकी वाहने पार्क करुन अनधिकृत पे ॲण्ड पार्कचा वापर सुरु असून, सदर ठिकाणी २६ वाहने पार्क केल्याचे आढळून आले आहेत.

यापूर्वी सुद्धा टाऊनपार्क येथील जागेत दि.११.०३.२०२२ रोजीच्या पाहणीत भूखंड 'अ' च्या जागेत मजूर नकाशा व्यतिरिक्त तसेच, महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता मुख्य प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूस लोखंडी अँगल वापरून काचेच्या सहाय्याने १४ मी. x ८ मी. या आकारमानाचे अनधिकृत बांधकाम करुन, सदर जागेत गाडीचे वर्कशॉप व SE STEAM ENGINE या नावाने व्यवसाय सुरु केल्याचे निदर्शनास आल्यानंतर दि.११.०३.२०२२ रोजी मे. वर्धमान इंटरटेन्टमेंट ॲण्ड हॉस्पिटॅलिटी प्रा.लि. यांना सदर अनधिकृत बांधकाम ताबडतोब काढून टाकण्यात यावे, असे कळविण्यात आले होते. तथापि, त्यांनी सदरचे अनधिकृत बांधकाम अद्याप काढून घेतलेले नाही.

सदर आरक्षण क्र.२६२ टाऊनपार्क कामी विकासकासोबत वाद झाल्याने, मा. निवृत्त न्यायाधीश उच्च न्यायालय यांची लवादाकरिता नेमणूक करण्यात आली आहे. सदर वाढीव व अनधिकृत बांधकाम काढून टाकणेबाबत, तसेच, सदर आरक्षणा व्यतिरिक्त जागेत मंडप, स्टेज, डेकोरेशन करून लग्न समारंभासाठी भाड्याने देत असल्याने, व्यायामशाळ उभारून सुरु करण्यात आलेला व्यवसाय अनधिकृत बांधकाम करून सुरु करण्यात आलेले हॉटेल इ. होत असलेला वापर त्वरीत बंद करण्याबाबत मे. वर्धमान इंटरटेनमेंट ॲण्ड हॉस्पिटेलिटी प्रा.लि. यांना कळविण्यात आले असून, मा. निवृत्त न्यायाधीश, उच्च न्यायालय तथा लवाद याना देखिल अवगत करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत प्रस्तुत प्रकरण न्यायप्रविष्ट असून, मा. न्यायालयाच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.

************

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग. लक्षवेधी सूचना क्र.१४८

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन.

मा. श्री. रोहित पवार, श्री. अशोकराव चव्हाण, श्री. जितेश अंतापूरकर, श्री. मोहनराव हंबर्डे, श्री. राजेश एकडे, श्री. अबू आजमी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्रं. १४८

"Swiss Air Tracking Index असलेल्या IQAir ने मुंबईला २९ जानेवारी ते ८ फेब्रुवारी २०२३ या काळासाठी देशातील सर्वाधिक व जगातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक प्रदूषित शहर म्हणून घोषित केले असणे, मुंबईच्या हवेची पातळी सातत्याने वाईट व अतिवाईट या श्रेणींमध्ये असणे, मुंबईच्या हवेतील हानिकारक असलेल्या PM२.५, PM१० व mercury चे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढणे, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून, महाराष्ट्राची राजधानी असणे, मुंबईत एक कोटींहून अधिक लोक राहत असून देश विदेशातील राजकीय व उद्योग जगतातील पाहुणे इथे सातत्याने येत असणे, त्यामुळे मुंबईच्या हवेच्या पातळीत घट होणे ही सर्वार्थाने चुकीची बाब असणे, भविष्यात मुंबईच्या प्रदूषणाची समस्या दिल्ली सारखी गंभीर होण्याचा धोका असणे, तरी शासनाने यावर तातडीने उपाययोजना करण्याची गरज असणे, याबबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

..............................................................................................................................

मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग) यांचे निवेदन.

मुंबई शहर हे सात बेटांचे एकत्रीकरण करून बनलेले शहर आहे. मुंबई शहराची लोकसंख्या सुमारे १२४४२३७३ असून भारतातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले शहर आहे. मुंबई शहराची औद्योगीक शहर म्हणून फार पूर्वी ओळख करण्यात येत होती. स्वातंत्र्योत्तर काळात वाढते शहरीकरणामुळे मुंबईतील बहुतांशी उद्योग नजीकच्या ठाणे व रायगड जिल्हयात स्थलांतरीत झाले आहेत. मुंबईतील जागेच्या वाढत्या किंमती व औद्योगिक प्रक्रियेतील रसायनांचा वापर इ. बाबींमुळे बहुतांशी उद्योगजकांनी त्यांचे उद्योग मुंबई परिसरात बंद करुन पर्याप्त जागी स्थलांतरीत केले आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून मुंबई शहरातील हवेची गुणवत्ता तपासली जाते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे देण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांशी पालन करीत हवा तपासणी केंद्रे मुंबईत १४ ठिकाणी उभारलेली आहे. सदर यंत्रणेमधून प्राप्त होणारी आकडेवारी मंडळाच्या संकेतस्थाळावर प्रकाशित केली जाते.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ सन २०११ ते २०१५ या कालावधीतील भारतामधील २२ राज्यातील ९४ शहरांमधील हवेची गुणवत्ता प्रदूषित झाली असल्याचे प्रसिध्द केले होते. त्या-त्या शहरातील हवेतील धुलीकण (पीएम १०) या प्रदूषित घटकांबाबतची मात्रा प्रसिध्द केलेली होती. यामध्ये महाराष्ट्र राज्यातील शहरांमधील वातावरणातील हवेतील गुणवत्ता प्रदूषित झाल्याचे प्रसिध्द करण्यात आले होते. मा.राष्ट्रीय हरित लवादाने ६८१/२०१८ संदर्भात पारित केलेल्या आदेश दिनांक ०८/१०/२०१८ अन्वये महाराष्ट्रामधील प्रदूषित शहरांमध्ये मुंबई शहरांचा समावेश करण्यात आला होता.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी दिनांक ११/०८/२०१६ रोजी महानगरपालिका तसेच मंडळाच्या संबंधित प्रादेशिक अधिका-यांना हवा प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी कृती आराखडा तयार करुन विहित कालमर्यादेत उपाययोजना करण्यासाठी हवां (प्रतिबंध व नियंत्रण ) कायदा १९८१ अन्वये निर्देश दिले होते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे शहरांची हवेची गुणवत्ता सुस्थितीत करण्यासाठी महानगरपालिका/नियंत्रण अधिका-यांसोबत वेळोवेळी बैठका घेऊन कृती आराखडा तयार करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आलेले होते.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आदेशाची अंमलबजावणी करीत असताना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने १९ शहरांचा कृती आराखडा तयार करुन, राज्यस्तरीय हवा गुणवत्ता संनियंत्रण समितीच्या संमतीने सदर कृती आराखडा केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या त्रिसदस्यीय समितीस सादर केला होता व त्यास मान्यता मिळाली असून त्या अनुषंगाने कृती आराखडयाच्या अंमलबजावणीचे आदेश महानगरपालिकेस देण्यात आले आहेत. कृती आराखडयात त्यानुसार मुख्यत्व शहरातील रस्त्यावरील वर्दळीमुळे निर्माण होणारे धुलीकण नियंत्रणात आणणे, हवेतील धुलीकणाचे प्रमाण कमी करण्यासाठी, पालापाचोळा/घरगुती घनकचरा जाळल्यामुळे होणारे प्रदूषण कमी करणे, उद्योगांमुळे होणारे हवा प्रदूषण रोखणे, बांधकामाच्या घडामोडींमुळे निर्माण होणारे हवा प्रदूषण नियंत्रित करणे, शहरातील हवेतील धुलीकणाचे प्रमाण कमी करणे इत्यादी बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

कृती आराखडयांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे वेळोवेळी महानगरपालिका यांच्यासोबत आढावा बैठक घेण्यात येतात. तसेच शासनाच्या आदेशान्वये त्रिस्तरीय समिती गठीत करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने महाराष्ट्रातील मुंबईसह इतर १८ शहरांमध्ये हवा गुणवत्ता सुधारण्याबाबत नामांकित अशा राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था (निरी) व भारतीय प्रौद्योगिक अभियांत्रिकी संस्था, पवई (आय.आय.टी.) यांच्यासोबत करारनामा करुन, हवा प्रदूषणाचे प्रमुख स्त्रोत ओळखून त्यांचे मोजमाप करुन, तांत्रिक आराखडा तयार करण्याचे काम त्यांच्याकडे सोपविण्यात आले आहे.

हवा प्रदूषण नियंत्रण करण्याकरिता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे करण्यात येणा-या ठळक बाबी पुढीलप्रमाणे:-

१. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे राष्ट्रीय वातावरणीय हवेची गुणवत्ता तपासणी उपक्रम/ राज्य वातावरणीय हवेची गुणवत्ता तपासणी उपक्रमांतर्गत राज्यातील शहरामध्ये ६९ ठिकाण सतत हवा गुणवत्ता तपासणी संयंत्रणा(CAAQMS) कार्यान्वित केली आहे. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मुंबई मध्ये १४ ठिकाणी स्वयंचलीत वातावरणीय हवा गुणवत्ता तपासणी संयंत्रणेची (CAAQMS) यंत्रणा उभी केली आहे.
२. महाराष्ट्र राज्यातील प्रदूषित कारखान्यांच्या प्रदूषणाची पातळीचे मुल्यांकन करण्यासाठी मंडळाने पर्यावरण दक्षता केंद्र(एन्व्हायर्नमेंट डाटा केअर सेंटर) स्थापन केले आहे.
३. कोळसा वाहतूक करताना प्रामुख्याने कोळसा ट्रक वाहतुकीच्या वेळी आच्छादन करुन, वाहतूक करण्यासंदर्भात निर्देश देण्यात आले आहेत.

औद्योगिक वसाहतीमधील कृती आराखडा तयार करताना खालील मुद्दे विचारात घेण्यात आले आहेत:-

१. उद्योगांनी प्रदूषणाचे प्रमाण कमी करण्याच्या संदर्भात करावयाच्या उपाययोजनांमध्ये उपलब्ध नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन हवा, पाणी व घातक घनकचरा यांपासून होणारे प्रदूषणाचे प्रमाण कमी करणे.

२. जेथे बांधकाम चालू आहे, अशा ठिकाणी धुळीचे प्रमाण कमी करण्यासाठी सभोवताली बॅरिअर्स, पत्रे लावावेत व अन्य उपाययोजनांचा वापर करावा.

३. धुळीचे प्रमाण कमी करण्यासाठी ग्रीन बेल्ट डेव्हलपमेंट हा उपक्रम हाती घेणे.

४. उद्योगांनी त्यांच्या बॉयलरसाठी इंधन म्हणून कोळसा, फरनेस ऑईल, बगॅज या इंधनांऐवजी पीएनजी (पेट्रोलियम नॅचरल गॅस) या हरीत इंधनाचा वापर करणे. महानगर गॅस कंपनीने सदर उद्योगांना पीएनजी/(कॉम्प्रेसड् नॅचरल गॅस) सीएनजी गॅसचा पुरवठा करणे चालू केले आहे.

५. रासायनिक उद्योगांनी त्यांच्या आवारामध्ये उत्सर्जित होणाऱ्या व्हीओसी (व्होलाटाइल ऑरगॅनिक कार्बन) ची मोजमाप करणारी यंत्रणा उभारली आहे.

मुंबई महापालिकेने दि. १३.०३.२०२३ च्या आदेशाद्वारे मुंबई शहरातील हवा प्रदूषण नियंत्रण आणण्याकरीता केलेल्या कृती आराखड्याची प्रभावी अमंलबजावणीसाठी आठ सदस्यीय समिती गठीत केली आहे व सदर समितीची पहिली बैठक दि. १४.०३.२०२३ रोजी घेण्यात आली आहे.

तसेच लखनौ व दिल्ली येथे शहरातील हवा प्रदूषण नियंत्रण करण्याकरीता केलेल्या उपाययोजनांचा अभ्यास करुन अशा प्रकारची उपाययोजना मुंबई शहरात करणेबाबत अभ्यासाअंती निर्णय घेण्यात येईल.

..........................................

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग. लक्षवेधी सूचना क्र.१९९१

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन.

श्री. शांताराम मोरे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र. १९९१ पुढीलप्रमाणे आहे.

" भिवंडी शहर हे कापड उद्योगासाठी भारतात प्रसिद्ध शहर असणे, या शहरात कापड उद्योगाशी संबंधित अनेक कारखाने व कपड्यांवर प्रक्रिया करणाऱ्या मोठमोठ्या डाईंग्स असणे, या डाईंग्स मध्ये कपड्यांवर प्रक्रिया केली जाणे, ही प्रक्रिया करत असताना कपड्यांना पॉलिश करण्यासाठी त्याला मोठ्या प्रमाणात उष्णता निर्माण करून कपड्यांवर प्रक्रिया करावी लागत असणे, ही उष्णता निर्माण करण्यासाठी डाईंग्स मध्ये तेथील आजूबाजूच्या परिसरात प्रदूषण होऊ नये म्हणून नैसर्गिक कोळसा जाळणे गरजेचे असणे, परंतु भिवंडी येथे पर्यावरण प्रादेशिक अधिकारी श्रीमती सौजन्या पाटील यांच्या कार्यक्षेत्रात डाईंग्स मध्ये मोठ्या प्रमाणावर कोळशाच्या ठिकाणी प्लास्टिक चिंध्या वापरल्या जात असणे, भिवंडी शहरात विविध ठिकाणी लोक वस्ती शेजारीच या डाईंग्स असणे, प्रक्रियेमध्ये प्लास्टिकच्या चिंध्या वापरल्यामुळे या डाईंग्स च्या चिमण्यांमधून लहान प्लास्टिकचे कण हे तेथील लोकांच्या हवेत पसरुन स्थानिकांना विविध श्वसनाचे आजार होणे, यामुळे भिवंडी शहरातील लाखो नागरिक गंभीर आजाराने ग्रस्त झालेले असणे, या विरोधात स्थानिक नागरिकांनी पर्यावरण प्रादेशिक अधिकारी सौजन्या पाटील यांच्याकडे अनेक तक्रारी करुनही त्यांच्याकडून उक्त डाईंग्स मालकांवर कोणतीच कारवाई करण्यात न येणे, सदर प्रादेशिक अधिकारी यांच उक्त डाईंग्स कंपनीसोबत मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार असल्याचा आरोप स्थानिक नागरीकांकडून होत असणे, त्यामुळे त्यांच्याकडून कारवाई करण्याकडे जाणीव पुर्वक दुर्लक्ष होत असणे, शासनाने यासर्व प्रकरणी चौकशी करुन वायू प्रदूषण करणाऱ्या उक्त डाईंग्स कंपनीवर व त्यांना पाठिशी घालणाऱ्या संबंधित प्रादेशिक अधिकारी यांच्यावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने आतापर्यंत केलेली कार्यवाही ."

.................................................................................................

मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग) यांचे निवेदन.

भिवंडी शहराच्या कार्यक्षेत्रात एकूण ११४४ उद्योग कार्यरत आहेत. त्यापैकी कापडावर रंग करणारे - ५२, कापडावर प्रक्रिया करणारे - ७४ व कापडावर कांजी करणारे- १२१ उद्योग कार्यरत आहेत. सदर उद्योगांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संमतीपत्र घेतलेले असून संमतीपत्रामध्ये दिलेल्या शर्ती व अटीनुसार औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरिता काही उद्योगांनी प्राथमिक व तृतीय स्वरुपाची व काही उद्योगांनी प्राथमिक, व्दितीय व तृतीय स्वरुपाची जल प्रदूषण नियंत्रण प्रणाली बसविलेली आहे. इंधन म्हणून काही उद्योगांमध्ये कोळसाचा वापर केला जातो. सर्व उद्योगांनी हवा प्रदूषण नियंत्रण करणेकरीता डस्ट कलेक्टर व वेट स्क्रबर (Dust Collector & Wet Scrubber) ही अद्यावत यंत्रणा बसविलेली आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे हवा प्रदूषणाबाबत तसेच बॉयलरमध्ये प्लास्टिक व लाकुड यांचा इंधन म्हणून वापर केल्यामुळे नागरिकांना आरोग्याचा त्रास होत आहे याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून ४५ उद्योगाची पहाणी करण्यात आली. पहाणीवेळी दोषी आढळून आलेल्या उद्योगांवर माहे जानेवारी २०२२ ते फेब्रुवारी २०२३ पर्यंत जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) कायदा १९७४ चे ३३ अ अन्वये व हवा (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) कायदा १९८१ चे ३१ अ अन्वये, २६ उद्योगांना कारणे दाखवा नोटीस, ११ उद्योगांना प्रस्तावित आदेश, ७ उद्योगांना अंतरिम आदेश व १ उद्योगांना बंदचे आदेश बजावण्यात आले आहेत.

प्रादेशिक कार्यालय, कल्याण यांनी दि. २९/१२/२०२२ रोजी डाईंग व सायजिंग असोशिएशन यांच्या प्रतिनिधी व उद्योग धारकांसोबत बैठक घेऊन संमतीपत्रामध्ये नमुद केलेल्या इंधनाव्यतिरिक्त कोणत्याही इंधनाचा वापर बॉयलरमध्ये करु नये तसेच हवा प्रदुषण नियंत्रण करणेकरीता बसविण्यात आलेली सयंत्रणा सुरळीत व नियमितपणे चालविण्याचा सुचना सर्व असोसिएशन प्रतिनिधी व उद्योजकांना देण्यात आल्या आहेत.

याव्यतिरिक्त वेळोवेळी दिलेल्या भेटी दरम्यान संमतीपत्रातील अटीं व शर्तीचे उल्लंघन करणाऱ्या उद्योजकांवर जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) कायदा १९७४ चे ३३ अ अन्वये व हवा (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) कायदा १९८१ चे ३१ अ अन्वये माहे जानेवारी २०२२ ते फेब्रुवारी २०२३ पर्यंत एकूण (२३) उद्योगांना कारणे दाखवा नोटीस, (७) उद्योगांना प्रस्तावित आदेश, (८) उद्योगांना अंतरिम आदेश, (३) उद्योगांना उद्योग बंद करण्याबाबतचे आदेश बजावण्यात आले आहेत.

वेळोवेळी केलेल्या कारवाईमुळे उद्योजकांनी बॉयलरमध्ये प्लास्टिक व लाकूड याचा इंधन म्हणून वापर करणे थांबविले आहे, असे पुश्न:च पाहणी दरम्यान निर्दशनास आले आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सदर बाबतच्या तक्रारी कमी झाल्या आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून वेळोवेळी तक्रारीचा पाठपुरावा करुन दोषी आढळणाऱ्या उद्योगांवर कारवाई करण्यात आलेली आहे. सदर तक्रारींबाबत दुर्लक्ष केले जाते ही बाब वस्तुस्थितीशी आधारित नाही.

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांच्या आरोग्य विभागाकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार वायु प्रदूषणामुळे श्वसनाचे आजार असलेले व त्यामुळे गंभीर आजाराने ग्रस्त असलेले रुग्ण नागरी आरोग्य केंद्र व बीजीपी दवाखाना येथे आढळुन आलेले नाहीत, असे नमुद केलेले आहे.

***************************

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

लक्षवेधी सूचना क्र. २१०२

## महाराष्ट्र विधानसभा सन २०२३ चे अर्थसंकल्पिय अधिवेशन

श्री. पी. एन.पाटील (सडोलीकर), विधानसभा सदस्य यांनी नियम, १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २१०२ पुढीलप्रमाणे आहे :-

"करवीर विधानसभा मतदार संघातील मौजे वडणगे (ता.करवीर, जि.कोल्हापुर) येथे राज्य सरोवर संवर्धन कार्यक्रमातंर्गत तलाव संवर्धन करणेचे काम शासन निर्णय दि. ०७/११/२०१७ अन्वये ३ कोटी ६९ लाख ४७ हजार १७४ रूपयांची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असणे, सदर कामास दि.२९/०८/२०१८ रोजी कार्यारंभ आदेश दिला असणे, त्याची मुदत दि.३१/१२/२०२० रोजी संपली असणे, सदर कामावर रु. २८ लक्ष ५५ हजार ३४४ इतका खर्च झाला असणे, सदरचे काम मे.वरदलक्ष्मी कंस्ट्रक्शन, प्रा.लि.शाहूपूरी, कोल्हापुर हा मक्तेदार करत असणे, सदरच्या कालावधीत पहिल्याच पावसात त्यांनी बांधलेली तलावाची दिडशे फुट लांबीची व दहा फुट उंचीची भिंत सोमवार दि.२४ जून २०१९ रोजी कोसळली असणे, त्यामुळे येथील ग्रामस्थांत संतापाची लाट उसळली आणि सदरचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याने काम बंद पडले असणे, कामाची चौकशी करण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थांकडून होत असणे, त्यामुळे दि.१३/०१/२०२२ दरम्यानच्या काळात सदर तलावाचे काम पुर्ण होण्याकरीता आढावा बैठक घेवुन १५ दिवसांत दुरुस्ती आराखडा तयार करा, मक्तेदाराला नोटिस काढून १५ दिवसांची मुदत द्या, त्याचबरोबर मक्तेदार लोकवर्गणी भरून काम सुरु करणार आहे किंवा नाही ते पाहून काम सुरु करणार नसल्यास मक्तेदार बदलणे, व अधिका-यांनी पुढील कार्यवाही तातडीने करावी, अशा सुचना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापुर यांना दिली असणे, परंतु त्याबाबत कोणताही प्रतिसाद मिळाला नसणे, याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे शासनाने दिलेल्या निधीचा योग्य वापर होत नसल्याचे निदर्शनास येत असलयाने संबधित ठेकेदार यांचेवर व संगनमत करणाऱ्या संबंधित अधिका-यांवर कडक कारवाई करणे गरजेचे असणे, परिणामी येथील जतनेत पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

## मा. मंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल यांचे निवेदन

मौ. वडणगे, ता. करवीर, जि. कोल्हापूर येथील वडणगे तलावाचा पर्यावरणीय संवर्धनाचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांनी दिनांक २८/०६/२०१५ रोजी पर्यावरण विभागास सादर केला होता. सदर प्रस्ताव दि.०४.०१.२०१७ रोजीच्या सुकाणू समितीच्या बैठकीत सादर करण्यात आला होता. सुकाणू समितीने दिलेल्या सूचनाच्या अधीन राहून सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.

राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत मौ. वडणगे, ता. करवीर, जि. कोल्हापूर येथील वडणगे तलावाचे पर्यावरणीय संवर्धन करण्यासाठी दि. ०७ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.३,७०,०४,३१५/- इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली होती. तसेच सदर कामासाठी पहिला हप्ता म्हणून रु.६०.०० लक्ष इतका निधी वितरित करण्यात आलेला होता. सदर प्रशासकीय मान्यतेन्वये राज्य शासनाचा हिस्सा रुपये ३,३३,०३,८८३/- व ग्रामपंचायतीचा हिस्सा रु.३७,००,४३२/- इतका आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी/ कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद कोल्हापूर यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार वडणगे तलावाचे पर्यावरणीय संवर्धन प्रस्तावास मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,पुणे यांनी दि.०५.०५.२०१८ रोजी तांत्रिक मान्यता दिली होती. वडणगे तलावाच्या संवर्धनाचे काम करणेकरिता मे.वरदलक्ष्मी कंस्ट्रक्शन, प्रा.लि.शाहूपूरी, कोल्हापुर यांना दि.२९.०८.२०१८ रोजी कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आल्याचे नमूद केले आहे. सदर काम पूर्ण करण्याची मुदत १५ महिने म्हणजेच दि.३१.१२.२०२० पर्यंत होती. त्यानुसार सदर कामाची सूरूवात दि.०२ नोव्हेंबर,२०१८ रोजी करण्यात आली.

दिनांक २४ जून, २०१९ रोजी पहाटे १७५ मीटर लांबीपैकी ४५ मीटर लांबीच्या संरक्षण भिंतीचा अंशत: भाग कोसळला आहे. सदरबाबत ग्रामस्थांनी जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना सादर केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने तत्कालीन कार्यकारी अभियंता तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रत्यक्ष कामाच्या स्थळाची पाहणी केली. सदर पाहणीदरम्यान काम सुरु करण्यापुर्वी कामासाठी वापरण्यात येणा-या दगड, वाळू, सिमेंट, व काम सुरु असताना क्रॉक्रीट क्युव टेस्ट व मॉरटरचा तपासणी अहवाल गुणनियंत्रण जिल्हा प्रयोगशाळा कोल्हापूर यांचेकडून घेणेत आला आहे. त्यानुसार काम गुणवत्तापूर्ण व योग्य दर्जाचे झालेले आहे याची खात्री करण्यात आली. तसेच अतिवृष्टी झाल्याने भिंतीवर येणा-या माती भरावाचा अतिरिक्त दाबाने संरक्षण भिंतीचा अंशत: भाग कोसळल्याचे निदर्शनास आले.

तत्कालीन कार्यकारी अभियंता, उपअभियंता व तांत्रिक सल्लागार (संकल्पन) यांनी सदर कोसळलेल्या संरक्षक भिंतीची पाहणी केली. सदर संरक्षक भितीच्या खालील पाया व अतिरिक्त येणारा माती भरावाचा दाब विचारात घेवून नव्याने संरक्षक भिंतीचे संकल्पन करून सुधारीत अंदाजपत्रक तयार केले. सदर नवीन संकल्पनानुसार झालेल्या तांत्रिक बदलास व अतिरिक्त दरसुचीस मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे प्रादेशिक विभाग पुणे यांचेकडे वेळोवेळी सादर करण्यात आलेला आहे. परंतु अद्याप त्यास मान्यता मिळालेली नसल्याचे जिल्हा परिषद कोल्हापूर यांनी कळविले आहे.

सद्यस्थितीत संबंधित मक्तेदाराकडून १३० मी संरक्षक भिंत बांधणे काम पुर्ण झाले आहे. प्रत्यक्ष काम करताना मऊ भूस्तर लागल्याने पाईल फाऊंडेशनद्वारे सरंक्षक भिंत बांधण्यात आली. त्यानुसार रु.२८.५५ लक्षची मोजमाप नोंदवही करुन पहिले धावते देयक करणेत आले आहे. त्यापैकी रुपये १३.२० लक्ष इतकी रक्कम मक्तेदारास अदा केली आहे. अतिरिक्त बाब अंदाजे रुपये २९.२९ लक्षची झालेली असून त्यास मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे त्याचे देयक मक्तेदारास देण्यात आलेले नाही. सबब, सद्यस्थितीत अतिरिक्त बाबीसह

रु ४९.८४ लक्ष इतक्या रकमेचे काम मक्तेदाराकडून झालेले असून त्यापोटी रुपये १३.२० लक्ष इतकीच रक्कम मक्तेदारास अदा केली आहे.

वडणगे तलावाचे काम पूर्ण करण्यासाठी दि.१३/०१/२०२२ रोजी अध्यक्ष, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी पुढीलप्रमाणे निर्देश दिले होते.

१) मंजुर निधी पैकी स्थानिक स्वराज्य संस्थेचा १० टक्के हिस्सा रक्कम रुपये ६.०० लक्ष ग्रामपंचायतीने जिल्हा परिषदेच्या बँक खात्यात तात्काळ भरणा करावा.

२) मक्तेदार यांना १५ दिवसात काम सुरु करणेबाबत नोटीस देणेत यावी.

३) तांत्रिक बदलाबाबत कार्यकारी अभियंता यांनी मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांचेशी चर्चाकरुन विषयाचे गांभीर्य निर्शनास आणून द्यावे.

उपरोक्त निर्देशाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेने वडणगे ग्रामपंचायतीस १० टक्के हिस्सा रक्कम रुपये ६.०० लक्ष जिल्हा परिषदेच्या बँक खात्यात तात्काळ भरणा करणेबाबत वेळोवेळी लेखी पत्रान्वये कळविले. परंतु वडणगे ग्रामपंचायतीने सदर हिस्सा भरणा करणेस असमर्थता दर्शवलेली आहे. तसेच मक्तेदारास १५ दिवसात काम सुरु करणेबाबत दि.१३.०१.२०२२ व दि.२४.०२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळिवण्यात आलेले आहे. तांत्रिक बदलास मान्यता मिळणेबाबत मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांना वेळोवेळी प्रस्ताव सादर केलेला आहे.

राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत मंजूर वडणगे तलावाच्या प्रशासकीय मान्यतेच्या शासन निर्णयात नमूद वित्तीय आकृतीबंधीनुसार ग्रामपंचायतीने १०% हिस्सा भरणे आवश्यक आहे. सदर १०% हिस्साचा भरणा करण्याबाबत जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी वडणगे ग्रामपंचायतीस वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या होत्या. परंतु वडणगे ग्रामपंचायतीने सदर हिस्सा भरणा करणेस असमर्थता दर्शवलेली असल्याने योजनेच्या वित्तीय आकृती बंधानुसार योजनेचे पुढील काम करणे शक्य होणार नाही. तथापि, काम पुर्ण होण्याच्या दृष्टीने १०० टक्के शासन हिस्सा सदर कामास उपलब्ध झालेस काम पुर्ण करता येईल. अन्यथा योजनेचे काम आहे त्या स्थितीत अंतिम करणे उचीत होईल असे कार्यकारी अभियंता,जिल्हा परिषद कोल्हापूर यांनी दि.१८.०३.२०२२ रोजीच्या पत्रान्वये शासनास अवगत केले आहे.

*****

लक्षवेधी सूचना क्र. १५८८

## सन २०२३ पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री.अजय चौधरी, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्रमांक १५८८ पुढ़ीलप्रमाणे आहे :-**

"मुंबईतील वरळी येथील बी.डी.डी. चाळ परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत वास्तव्य असणारे व शासन निर्णयानुसार संरक्षणास पात्र असणारे अधिकृत भाडेकरु झोपडीधारकांवर अचानक बी.ड़ी.डी. चाळीचे नव्याने आलेल्या चाळ अधीक्षक यांनी कारवाई करणे, कारवाई झालेल्या झोपड्या सन २००० पूर्वीच्या असून त्याची नोंद मुंबई जिल्हाधिकारी कार्यालयाने केलेल्या सर्वेमध्ये असणे, सन २००० च्या शासन निर्णयानुसार सार्व. बांधकाम विभागाने या झोपडीधारकांकडील असलेले पुरावे पाहून भाडेदारी हस्तांतर शुल्क रु.४०,०००/- आकारुन झोपडीधारकांना नियमित करण्यात आलेले असणे, आजतागायत या झोपडीधारकांचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभाग नियमित स्विकारत असणे, विशेषतः सदर कारवाई करतांना झोपडपट्टीधारकांच्या कागदपत्राची कोणत्याही प्रकारची तपासणी न करता व त्यांना कोणत्याही प्रकारची नोटीस न देता कांही झोपडीधारकांच्या झोपड्या जमीन दोस्त करण्यात येणे, सदर कारवाई करतांना पोलीस संरक्षण न घेता खासगी सुरक्षा रक्षकांच्या उपस्थितीत झोपड्या जमीनदोस्त करण्यात येणे, याबाबत झोपडीधारकांनी वरळी पोलीस ठाणे व पोलीस कंट्रोल रुमकडे तक्रार केल्यानंतर वरळी पोलीस ठाण्याच्या अधिका-यांनी घटनास्थळी हजर होत झोपडीधारकांची बाजू ऐकुन व कागदपत्रे तपासून सदर कारवाई थांबविण्याची विनंती बी.डी.डी. चाळीच्या व्यवस्थापकास करुनही त्यांना न जुमानता जोपड्या जमीन दोस्त करण्यात येणे, उक्त कारवाई झालेले झोपडीधारक गेल्या अनेक वर्षापासून झोपड्यांची दुरुस्ती करण्याची परवानगी मागत असणे, तसेच बी.डी.डी. चाळ पुनर्वसनात या झोपड्याचा समावेश व्हावा आणि आपल्याकडे असलेल्या सर्व कागदपत्रे व पुराव्यांची समक्ष अधिका-यांमार्फत पडताळणी करावी आदींसाठी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सार्व. बांधकाम मंत्री, म्हाडा, सार्वजनिक बांधकाम विभाग, वरळी यांच्याकडे पाठपुरावा करीत असणे, शासन निर्णयानुसार पात्र असलेल्या ऊक्त झोपडीधारकांकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन या झोपडीधारकांचे योग्य पुनर्वसन करणे आवश्यक असतांना याउलट त्यांना अनधिकृत गृहीत धरुन मनमानी पध्दतीने बी.डी.डी चाळीच्या व्यवस्थापकाने त्यांच्यावर कारवाई करणे, ज्या झोपडीधारकांच्या झोपड्या पाडल्या आहेत त्यांना तात्पूरत्या जागा देण्यासाठी त्यांचे शासकीय गोडावूनमध्ये किंवा संक्रमण शिबिरात योग्य ती कागदपत्रे देउन त्यांना स्थलांतरीत करावे

अशी मागणी उक्त झोपडीधारकांकडून होत असणे, शासनाने यासर्व प्रकरणाची चौकशी करुन केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रीया."

## मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

मुंबई विकास विभागामार्फत (बी.डी.डी.) सन १९२१-१९२५ च्या दरम्यान मुंबईतील वरळी, नायगांव, ना. म. जोशी मार्ग ( डिलाईट रोड ) व शिवडी येथे एकूण २०७ चाळी बांधण्यात आल्या आहेत. प्रत्येक चाळ ही तळ + ३ मजल्यांची असून त्यात प्रत्येकी जवळपास ८० रहिवाशी गाळे आहेत. तसेच सदरहू चाळ परिसरात काही झोपड्या व अनधिकृत बांधकामे करण्यात आली आहेत.

बी.डी.डी. चाळ परिसरातील ३५६ झोपडीधारकांचा प्रकल्पग्रस्त म्हणून बी.डी.डी. चाळींच्या पुनर्बांधणी योजनेत समावेश करून त्यांचेकडून नियमानुसार सेवाशुल्क आकारण्याचा निर्णय दि.२२/९/२००६ च्या शासन पत्रान्वये घेण्यात आला आहे. सदरहू चाळींचे संरक्षण करणे व देखभाल करणे ही जबाबदारी संचालक, मुंबई विकास विभाग यांची आहे.

मुंबईतील वरळी येथील शिधावाटप कार्यालया समोरील अंदाजे प्रत्येकी ३x५ फुट आकाराचे एकुण ५ बांधकामे तसेच, विकास विभाग चाळ क्र. ११७ वरळी येथील पंप हाऊस आवारात प्रत्येकी अंदाजे ३x५ फुट आकाराचे ८ बांधकामे अशी एकुण १३ अनधिकृत बांधकामे होती. सदर अनधिकृत बांधकामे बंद अवस्थेत होती. तसेच त्यामध्ये कोणाचेही वास्तव्य नव्हते किंवा त्यामध्ये कोणत्याही प्रकाराचे घरगुती सामान किंवा इतर वस्तू नव्हत्या. सदरची अनधिकृत बांधकामे निष्कसित करण्याकरता संचालक बी.डी.डी. यांनी पोलीस बळ मिळणेबाबत पोलिसांना विनंती केली होती. मात्र पोलीस बळ मिळाले नसल्याने शासन स्थापित सुरक्षा रक्षक मंडळ, बृहन्मुंबई, ठाणे यांचे संरक्षण घेऊन उक्त १३ अनधिकृत बांधकामे हटविण्यात आलेली आहेत. तसेच सदर अनधिकृत बांधकामे म्हाडा ने सन २०१७-१८ मध्ये केलेल्या सर्व्हेमध्ये आढळून येत नाहीत. त्यामुळे सदर बांधकाम २००० पूर्वीचे आहे, असे जे नमूद केलेले आहे, त्यामध्ये तथ्य नाही. संचालक बी.डी.डी. चाळ यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार, उपरोक्त नमूद ३५६ झोपडीधारक्रांमध्ये सदरहू १३ अनधिकृत बांधकामांचा समावेश नाही.

********

लक्षवेधी सूचना क्र.१७३२

# सन २०२३ पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. प्रकाश आबिटकर, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १७३२ पुढीलप्रमाणे आहे :-

"मुंबई शहराच्या विकासामध्ये गिरणी कामगारांचा मोलाचा वाटा असून मुंबईमध्ये डी सी रूल मध्ये १९९०-९१ सालात बदल केल्यामुळे मुंबईमध्ये कारखाने गिरण्या चालवणे ऐवजी बंद करून त्या जागेचा विकास करण्याला प्रोस्ताहन मिळाले ही बाब माहे जानेवारी, २०२३ वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, गिरणा बंद झालेल्या जागेवर मॉल व निवासी इमारती उभ्या करण्यात आल्या असणे, या प्रक्रियेला विरोध सर्वच गिरणी कामगारांनी करणे, गिरणी कामगारांच्या मागण्या प्रामुख्याने सरकारचा नागरिक कमाल जमीन धारणा कायदा शासन निर्णय प्रभावाने रद्द करणे, गिरणी कामगारांना मुंबईत गिरण्यांच्या जागी घर देऊन पुनर्वसन करणे, पुनर्वसन नागरिक कमाल जमीन धारणा कायद्यामधील जमिनीवर करणे, गिरणी कामगारांना मोफत घर देणे या असणे, त्याचे परिणाम मुंबईचे बंद गिरण्यातील कामगारांना मुंबईत घरे देऊन गिरण्यांच्या जागेत त्यांना त्यांच्या वारसांना नोकऱ्या देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याचा नियम सरकारला करावा लागणे यात एक लाख ७५ हजार गिरणी कामगारांची घरे मिळण्याची नोंद होणे इतक्या मोठ्या संख्येपैकी आजातागायत मात्र पंधरा हजार गिरणी कामगारांनाच आठ वर्षात घरे उपलब्ध होणे, तसेच कोणत्याही गिरणी कामगारांच्या वारसदारांना नोकऱ्या देण्यात न येणे, याबाबत तत्का. गृहनिर्माण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ७/४/२०२२ रोजी कामगारांच्या घर वाटपासंदर्भात धोरण निश्चितीबाबत बैठक पार पडणे, बैठकीमध्ये मंत्री महोदयांनी मुंबई गिरणी कामगारांसाठीच्या घरासंदर्भात सविस्तर चर्चा करणे त्यामध्ये म्हाडा व एमएमआरडीए च्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या सहमतीच्या अनुषंगाने निर्देश देणे, प्रामुख्याने मुंबई गिरणी कामगारासाठी मौजे कोण तालुका पनवेल जिल्हा ठाणे येथे डेंटल हाऊसिंग अंतर्गत एमएमआरडीए कडून माडाकडे प्राप्त होणाऱ्या जोड सदनीकांवर दुरुस्तीसाठी काही खर्च अपेक्षित आहे तो म्हाडा कडून एम.एम.आर.डी.ए. ला प्राप्त होणाऱ्या सदनीकांच्या किमतीतून वजा करून उर्वरित रक्कम म्हाडाने एमएमआरडीएला प्रधान करण, मौजे कोण तालुका पनवेल जिल्हा ठाणे येथील एम.एम.आर.डी.ए. कडून म्हाडाकडे प्राप्त होणाऱ्या घरांसाठी काढलेल्या सोडीतील पात्र लाभार्थी घर घेऊ इच्छित नसल्यास त्यांना तशी लेखी विनंती म्हाडाकडे करावी व त्यानुसार संबंधितांची नावे लाभार्थींच्या यादी मधून वगळून ती पुढील सोडतींमध्ये घेण्यात येणे, मुंबईतील गिरण्या जागेवरील सेस इमारतीचा पुनर्विकास म्हाडाच्या मुंबईत इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने तर उर्वरित जागेचा पुनर्विकास बृहन्मुंबई महानगरपालिकेने कालबद्ध कार्यक्रम आखून करणे मुंबई गिरणी कामगारातील बांधलेल्या घरांसाठी सोडती काढलेल्या घरांचा ताबा पुढील दोन महिन्यात संबंधित कामगारांना देण्यात येणे (मा. न्यायालयीन बाबी व इतर वादग्रस्त बाबी वगळून) मुंबई गिरणी कामगारांची पात्रता तपासताना म्हाडाच्या स्तरावर काही अडचण उद्भवत असल्यास ती दूर करण्यासाठी एखाद्या खाजगी यंत्रणेची मदत घेवून महाडाकडून कालबध्दपणे पोग्राम आखण्याची आवश्यकता असणे, वर्षानुवर्षे गिरणी

कामगारांच्या घरांचा प्रश्न प्रलंबित राहल्याने बहुतांशी गीरणी कामगार कालपरत्वे मृत्युमुखी पडणे त्यामुळे हयात असणाऱ्या व मयत कामगारांच्या वारसांना वेळेत घरे मिळण्याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेवून करावयाची कार्यवाही शासनाची भूमीका व प्रतिक्रिया."

---

मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

बृहन्मुंबईतील कापड गिरण्यांच्या सन १९८२ च्या संपानंतर बंद पडलेल्या/आजारी कापड गिरण्यांच्या विक्री व विकासासंदर्भात राज्य मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली-१९९१ मध्ये विनियम ५८ (१) (ब) समाविष्ट करण्यात आला. तसेच बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहनात्मक नियमावली-२०३४ च्या विनियम ३५ मध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. सदरहू तरतुदीनुसार मुंबईतील ५८ बंद /आजारी कापड गिरण्यांची मोकळी जागा व शिल्लक चटई क्षेत्र यांचे वाटप १/३ हिस्सा बृहन्मुंबई महानगरपालिका, १/३ हिस्सा म्हाडा व १/३ हिस्सा गिरणी मालक यांना देण्याची तरतूद केली आहे. म्हाडास उपलब्ध होणाऱ्या जमिनीवर गिरणी कामगारांसाठी २/३ गाळे व संक्रमण सदनिकांसाठी १/३ गाळे बांधण्याची तरतूद नगर विकास विभागाकडून उक्त नियमावलीमध्ये करण्यात आलेली आहे.

म्हाडाने गिरणी कामगारांच्या माहिती संकलनासंदर्भात राबविलेल्या तीन मोहिमांमध्ये (सन २०१०, सन २०११ व सन २०१७) सुमारे १,७४,००० गिरणी कामगार/त्यांच्या वारसांनी गिरणी कामगारांच्या घरांसाठी अर्ज केले आहेत. म्हाडास ताबा प्राप्त झालेल्या जमिनीपैकी २६ गिरण्यांच्या जागेवर गिरणी कामगारांसाठी १३,६३६ सदनिका व संक्रमण शिबीरासाठी ६४०९ सदनिका अशा एकूण २०,०४५ सदनिकांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच एका गिरणीच्या जागेवर गिरणी कामगारांसाठी ११२ सदनिका व संक्रमण शिबीरासाठी ५६ सदनिका अशा एकूण १६८ सदनिकांचे बांधकाम सुरु आहे.

गिरणी कामगारांच्या १५,८७० घरांसाठी म्हाडामार्फत एकूण ४ सोडती काढण्यात आल्या आहेत. दि.१/३/२०२० रोजी म्हाडामार्फत काढण्यात आलेल्या ३८९४ सदनिकांच्या सोडतीमधील १३९० यशस्वी गिरणी कामगारांना ऑनलाईन तात्पुरते देकारपत्र निर्गमित करण्यात आले आहे. तर २०३४ अपात्र गिरणी कामगारांना अपिल अर्ज सादर करण्यासाठी कळविण्यात आले आहे. उर्वरित अर्जदारांची पात्रता निश्चिती व सुनावणीचे काम म्हाडाच्या स्तरावर प्रगतीपथावर आहे.

मुंबई शहरात एनटीसी च्या ११ गिरण्यांच्या जमिनी आहेत. त्यापैकी ६ गिरण्यांच्या जमिनीवर जुन्या उपकरप्राप्त इमारतीमध्ये १६३० भाडेकरु/रहिवाशी वास्तव्यास आहेत. तर, ५ गिरण्यांच्या जमिनीवर जुन्या बिगर उपकरप्राप्त इमारतीमध्ये ४३२ भाडेकरु/रहिवाशी वास्त्यव्यास आहे. सदरहू ५ बिगर उपकरप्राप्त इमारतीपैकी ४ गिरण्यांच्या जमिनीवर उपकर लावण्याबाबत प्रस्ताव नुकताच म्हाडाने शासनास सादर केलेला आहे. तर, एका गिरणीच्या जागेवरील इमारत तोडून त्याठिकाणी नवीन इमारतीचे बांधकाम झाले आहे. त्यामुळे सदर इमारतीस उपकर लावणे शक्य नाही.

विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील विनियम ३५(७)(अ) अन्वये गिरणीच्या भूखंडावरील अस्तित्वातील इमारतींचे पुनर्वसन करुन भाडेकरुंना ४०५ चौ.फुट क्षेत्रफळाची सदनिका देण्याचे संबंधित गिरणी मालकास बंधनकारक आहे. सदरहू गिरणी मालकास ४.०० च.क्षे.नि. लागू असून, मालकाकडून महानगरपालिकेस प्रस्ताव सादर केल्यानंतर

सदरहू तरतुदींनुसार मंजूरी देण्यात येते. एनटीसीच्या उपरोक्त १० गिरण्याच्या भाडेकरुंच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाकडून महानगरपालिकेस प्राप्त झाल्यास विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील अनुज्ञेय कलमानुसार मंजूरी देण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात येईल.

**एम.एम.आर.डी.ए.कडील घरांची सद्य:स्थिती :-**

१) रेंन्टल हौसिंग योजनेअंतर्गत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे मौजे कोन, ता.पनवेल, जि. रायगड येथे बांधण्यात आलेल्या २४१७ सदनिकांची सोडत दि.२/१२/२०१६ रोजी म्हाडाच्या मुंबई मंडळाकडून काढण्यात आली. सदरहू योजनेत यशस्वी ठरलेल्या २४१७ अर्जदारांपैकी ७०४ गिरणी कामगार/वारसांनी सदनिकेच्या विक्री किंमतीचा भरणा केला आहे. त्यापैकी ३०० गिरणी कामगारांनी / वारसदारांनी सदनिकेच्या पूर्ण रकमेचा व मुद्रांक शुल्काचा भरणा केलेला आहे, त्यांना म्हाडाच्या मुंबई मंडळामार्फत वितरणपत्र निर्गमित करण्यात आले आहे.

२) सदरहू ठिकाणच्या इमारत क्र.१ ते ६ नवी मुंबई महानगर पालिकेला व इमारत क्र. ७ ते ११ या पनवेल महानगरपालिकेला कोव्हीड १९ क्वारंटाईन सेंटरसाठी देण्यात आलेल्या होत्या. सदरहू इमारतींच्या व सदनिकांच्या दुरुस्तीसाठी अंदाजे ५२.७१ कोटी खर्च अपेक्षित असून, तो खर्च म्हाडाकडून एम.एम.आर.डी.ए. ला प्राप्त होणाऱ्या सदनिकांच्या किंमतीतून वजा करुन, उर्वरित रक्कम म्हाडाने एम.एम.आर.डी.ए. ला प्रदान करण्याबाबत दि.७/४/२०२२ रोजी तत्कालीन मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचेकडे पार पडलेल्या बैठकीत ठरले.

३) त्यानुसार म्हाडाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार, सदरहू सदनिकांच्या दुरुस्तीसाठी ५२.७१ कोटी म्हाडाकडून एम.एम.आर.डी.ए. ला प्राप्त होणाऱ्या सदनिकांच्या किंमतीतून वजा करुन, उर्वरित रक्कम म्हाडाने एम.एम.आर.डी.ए. ला प्रदान करण्याबाबत उचित आदेश एम.एम.आर.डी.ए.ला देण्याची विनंती गृहनिर्माण विभागाच्या दि.२४/११/२०२२ रोजीच्या टिप्पणीन्वये नगर विकास विभागास करण्यात आली आहे. दरम्यानच्या काळात उक्त गिरणी कामगारांना घरांचा ताबा लवकरात लवकर देण्यासाठी मौजे कोन, ता.पनवेल येथील २०३६ सदनिकांच्या दुरुस्तीच्या कामाची ई-निविदा दि.३/३/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

******

लक्षवेधी सूचना क्र.१९१९

सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. रविंद्र वायकर, मा. वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १९१९ पुढीलप्रमाणे आहे :-**

"जोगेश्वरी (पूर्व) विधानसभा क्षेत्रातील म्हाडाच्या अखत्यारित येत असलेल्या इमारतींच्या अभिहस्तांतरण व पुनर्विकास तसेच मोकळया भूखंडाचा होत असलेला गैरवापर आदिकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, म्हाडाच्या अखत्यारितील बिंबीसार नगर येथील अनेक गृहनिर्माण संस्थांच्या इमारतीचे अभिहस्तांतरण गेल्या १९ वर्षापासून रखडलेले असणे, त्याचबरोबर पी.एम.जी.पी कॉलनी, पुनम नगर, अंधेरी (पूर्व) या म्हाडा वसाहतीमधील इमारत क्रमांक १ ते १७ इमारतींच्या पुनर्विकास विकासकाच्या नेमणूकीअभावी रखडलेला असणे, सदरहू विकासकाला १७ इमारतीचा एकत्रित पुनर्विकास करण्याकरिता दिनांक १३/११/२०१४, ०८/०७/२०१६ व ०५/०१/२०१८ मध्ये तीन वेळा देकार पत्रे देऊनही अद्याप १७ इमारतीच्या पुनर्विकासाबाबत कोणतीच कार्यवाही न होणे, या इमारतींपैकी काही इमारती अतिधोकादायक असून कोणत्याही क्षणी कोसळून जिवीतहानी होण्याची शक्यता, तसा अहवालही शासनास प्राप्त होणे, रहिवाशी जीव मुठीत घेऊन वास्तव्य करित असणे, मा. उप मुख्यमंत्री महोदयांनी मागील अधिवेशनात यासंदर्भात तातडीची बैठक घेण्याचे आश्वासन देऊनही अदयाप बैठक घेण्यात आलेली नसणे, सदर इमारतीचा पुनर्विकास म्हाडाच्या माध्यमातून करणे अथवा खाजगी विकासकाची तात्काळ नेमणूक करुन करण्यात आलेल्या सूचना विचार करण्याची गरज, तसेच कोकणनगर, मौजे-मजास ता. अंधेरी येथे म्हाडाचा सी.टी.एस नं १६९ या मोकळया भूखंडावर मोठया प्रमाणात डेब्रीज टाकण्यात येत असल्याचे निदर्शनास येणे, सदर भूखंडाचा होत असलेला गैरवापर, शासनाला सर्व शासकिय कार्यालय एकाच छताखाली घेण्याचा प्रस्ताव विचाराधीन घेण्याची आवश्यकता, त्याअनुषगाने शासनाने शिधावाटप कार्यालय, दुयम निबंधक, निवडणूक कार्यालय आदि मोकळया भूखंडावर आणल्यास सर्वसामान्य नागरिकांची होणारी गैरसोय दूर होण्यास मदत होणे, सदर इमारतीचा विकास म्हाडाच्या माध्यमातून करण्याची नितांत आवश्यकता, इमारतीचा पुनर्विकास करतांना नेमण्यात येणाऱ्या विकासकांकडून किती कालावधीत इमारतीचा पुनर्विकास करण्यात येणार याबाबत हमीपत्र घेण्याची गरज, उपरोक्त इमारतीच्या प्रलंबित असलेल्या समस्याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालण्याची आवश्यकता, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंकडून सातत्याने होत असलेला पाठपुरावा, याबाबत शासनाने लक्ष घालून शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

## मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

म्हाडाच्या बिंबीसार नगर येथील वसाहतीमध्ये एकूण १४ इमारती आहेत. सदरहू १४ इमारतींपैकी ६ इमारतींच्या संस्थांचे अभिहस्तांतरण झाले असून ७ इमारतींच्या संस्थांचे

अभिहस्तांरणाची कार्यवाही म्हाडाच्या स्तरावर सुरु आहे तर एका इमारतीच्या संस्थेचा प्रस्ताव म्हाडास अद्याप प्राप्त झालेला नाही.

पी.एम.जी.पी कॉलनी, पुनम नगर, जोगेश्वरी, अंधेरी (पूर्व) या म्हाडा वसाहतीमध्ये इ.क्र.१ ते १७ अशा एकूण १७ इमारती आहे. सदरहू इमारतींतील सभासदांनी अंधेरी पी.एम.जी.पी. कॉलनी को.ऑप.हौसिंग सोसायटीज असोसिएशन लि., या नावाने असोसिएशनची स्थापना केलेली आहे.

उक्त असोसिएशनने दि.४/४/२०११ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये उक्त १७ इमारतींचा एकत्रित पुनर्विकास करण्याबाबतचा ठराव मंजूर केला. असोसिएशनमधील ९८४ सभासदांपैकी ८७६ सभासदांनी पुनर्विकासाकरीता संमतीपत्रे दिली. त्यानुसार संस्थेचा पुनर्विकास करण्याकरीता निविदा काढण्यात आली व मे. श्रीपती इन्फ्रास्ट्रक्चर या विकासकाची नेमणूक करण्यात आली. सदरहू विकासक यांना उक्त १७ इमारतींचा एकत्रित पुनर्विकास करण्याकरीता म्हाडाकडून दि.१३/११/२०१४, दि.८/७/२०१६ व दि.५/१/२०१८ रोजी असे तीन वेळा देकारपत्रे देण्यात येऊनही उक्त इमारतींचा पुनर्विकास सदरहू विकासकाने केला नाही.

तद्नंतर DCPR-२०३४ प्रसिध्द करण्यात आला. सदरहू विकासकास DCPR-२०३४ मधील तरतुदीनुसार आणखी एक (चौथी) संधी देण्याची शिफारस म्हाडाने केली. त्यानुषंगाने सहकार विभागाच्या दि.४/७/२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार पुनर्विकास प्रकल्पाच्या एकूण किंमतीच्या २० टक्के इतकी बँक गॅरन्टी देण्याच्या अधीन राहून, सदरहू १७ इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक शासन पत्र दि.१५/२/२०२० अन्वये मंजूर करण्यात आला.

तथापि, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दि.०४/०७/२०१९ च्या शासन निर्णयानुसार बँक गॅरन्टी देण्यास उक्त विकासक तयार झाले नाही. रहिवाशांचे हित अबाधित राखण्याच्या दृष्टीने बँक गॅरटींची उपाययोजना महत्वाची होती. विकासकाची आर्थिकस्थिती व्यवस्थित नसल्याचे स्पष्ट झाल्याने म्हाडाने मे. श्रीपती रियल व्हेंचर्स एल.एल.पी. या विकासकाची नेमणूक रद्द करुन, सदरहू प्रकल्पाचा पुनर्विकास म्हाडाने स्वत: करावा किंवा म्हाडामार्फत अन्य विकासकाची नेमणूक करुन पुनर्विकास प्रकल्प पूर्ण करण्याच्या सूचना म्हाडास दि.१५/१२/२०२० रोजी देण्यात आल्या. त्यानुसार उक्त विकासकाची नियुक्ती रद्द केल्याचे उक्त संस्था व विकासकास म्हाडाने त्यांच्या दि.२८/१/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

दरम्यानच्या काळात सदर पुनर्विकास प्रकल्पाबाबत तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदय यांचेकडे दि.२६/५/२०२२ रोजी पार पडलेल्या बैठकीतील निर्देशानुसार विकासक म्हणून केलेली नेमणूक रद्द (टर्मिनेट) करण्यात आली आहे. तसेच मे. शिल्प कन्सलटींग सर्विसेस लिमिटेड यांची स्ट्रक्चरल ऑडिटर म्हणून म्हाडाकडून नियुक्ती करण्यात आली. सदरहू प्रकल्पातील १७ इमारतींपैकी एका इमारतीमधील (इमारत क्र.१३) येथील रहिवाशांनी विरोध केला, तर १६ इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले असून या इमारती C-1 Category

मध्ये मोडत असल्याबाबतचा अहवाल म्हाडास दि.६/१०/२०२२ रोजी सादर करण्यात आला आहे.

तद्नंतर, विकासक श्रीपती रिअल व्हेंचर्स प्रा.लि. यांनी उक्त वसाहतींचा पुनर्विकास विनियम ३३(९) अंतर्गत करण्याचा प्रस्ताव म्हाडास सादर केला. तसेच वसाहतींच्या फेडरेशन सदर विकासकास एक संधी द्यावी म्हणून केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने विनियम ३३(५) ऐवजी विनियम ३३(९) नुसार या वसाहतीचा पुनर्विकास करण्याचा प्रस्ताव दि.२७/६/२०२२ रोजी शासनास सादर केला आहे.

सदरहू प्रकल्पाची आर्थिक व्यवहार्यता, रहिवाशांचे स्थलांतरणाकरीता आवश्यक संक्रमण गाळे व पुनर्विकासाकरीता C&DA बाबत सविस्तर अहवाल तयार करण्यासाठी Project Management and Consultant म्हणून मे. ध्रुव कंन्स्लस्टंन्सी सर्विसेस लिमिटेड यांची म्हाडामार्फत नियुक्ती करण्यात आली आहे. मे. ध्रुव कंन्स्लटंन्सी यांनी त्यांचा अहवाल दि.२०/२/२०२३ रोजी म्हाडास सादर केला असून, त्यानुसार कार्यवाही म्हाडाच्या स्तरावर प्रगती पथावर आहे.

सर्वोदय नगर, मजासवाडी, मेघवाडी, जोगेश्वरी (पुर्व) येथील म्हाडाचा सी.टी.एस.नं.१६९ या मोकळ्या भूखंडावर टर्न की योजना राबविण्यास म्हाडाने मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार उक्त भूखंडावर निवासी सदनिकांचे बांधकाम करण्याकरीता निविदा पध्दतीने ठेकेदाराची नियुक्ती करण्यात आली होती. ठेकेदाराने सादर केलेल्या इमारत नकाशामध्ये काही सुधारणा सुचित करण्यात आल्यानुसार ठेकेदाराने सुधारित इमारत प्रस्ताव नकाशे सादर कलेले आहे. सदर नकाशाची छाननी केली असता, विकास नियंत्रण नियमावली व सुधारित विकास आराखडा २०३४ नुसार भूखंडावर आरक्षण बदल झाल्यामुळे योजना कार्यान्वित करणे म्हाडास शक्य झाले नाही.

*_*_*_*_*_*_*_*_*_*

**लक्षवेधी सूचना क्र.१३०८**

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

मा.श्री.वैभव नाईक, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १३०८ पुढीलप्रमाणे आहे :-

"माहे जानेवारी ते मे या कालावधीत राज्याच्या जलधी क्षेत्रात पर्ससीन नेट मासेमारीवर बंदी लागू असतांनाही वेंगुर्ले व मालवण तालुक्यात (जि.सिंधुदुर्ग) बिनधास्तपणे दिवस-रात्र बेकायदेशीर पर्ससीन नेट मासेमारी सुरू असणे, अशा पर्ससीन नेटधारकांना जाब विचारायला गेल्यास ते भर समुद्रात पारंपारिक मच्छिमारांच्या नौकावर चाल करून येत असणे, टोळीने अनधिकृतपणे पर्ससीन मासेमारी करून दहशत पसरविण्यात येणे, बेकायदेशीरपणे एलईडी पर्ससीन नेटव्दारे मासेमारी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी पारंपारीक मच्छिमारांच्या संघटनांनी वारंवार संबंधित अधिकारी व शासनाकडे वारंवार करूनही त्याकडे शासनाचे व प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे पारंपारीक मच्छीमारी संकटात आलेली असणे, शासनाने तातडीने एलईडी पर्ससीन मासेमारी व हायस्पीड ट्रॉलर्सना आळा घालण्याच्या अनुषंगाने कठोर उपाययोजना करण्याची आवश्यकता वा शासनाची प्रतिक्रिया"

---

### मा.मंत्री (मत्स्यव्यवसाय) यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्याला एकूण ७२० कि.मी. लांबीची किनारपट्टी लाभलेली असून, कोकण विभागामध्ये एकूण ०७ सागरी जिल्हयांचा समावेश आहे. महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम (सुधारणा) २०२१ कायद्यातील सुधारित तरतूदीन्वये अनधिकृत नौकांस आळा घालण्याच्या दृष्टीन शास्तीच्या रक्कमेमध्ये वाढ करण्यात आलेली आहे. त्याव्यतिरिक्त मासेमारी नौका, मासेमारी जाळे, नौकेवरील साहित्य व मासळी जप्त करण्याची तरतूद आहे. तसेच परप्रांतीय नौका राज्याच्या जलधी क्षेत्रात घुसखोरी करून मासेमारी करताना निदर्शनास आल्यास अशा नौकांना जास्तीत जास्त शास्ती लादण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात पर्ससीन मासेमारीचे नियमन करण्यात आलेले आहे. मासेमारी व्यवसायातील विविध घटकांचे विशेषत: पारंपारिक मच्छिमारांचे हितसंबंध जोपासणे व मासेमारी प्रयत्नांचे व्यवस्थापनाव्दारे मत्स्यसाठयाचे जतन करून, कमाल शाश्वत मत्स्योत्पादन राखणे हा आहे. त्याचप्रमाणे राज्याच्या जलधीक्षेत्रात एलईडी लाईटच्या सहाय्याने मासेमारी करण्यासाठी प्रतिबंध करण्यात आला आहे. शाश्वत मासेमारी टिकून राहण्याच्या अनुषंगाने उपलब्ध गस्ती नौकेव्दारे राज्याच्या जलधी क्षेत्रात प्रभावीपणे गस्त घालून अनधिकृत नौकांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे. त्यानुसार सिंधुदूर्ग जिल्हयात दि.२३/११/२०२१ ते २८/०२/२०२३ पर्यंत एकूण २९ अनधिकृत नौकांवर कारवाई करण्यात आलेली असून रू.६७.२४ लक्ष इतकी दंडाची रक्कम म्हणून महसूल शासन जमा करण्यात आलेला आहे. तसेच पर्ससीन, एलईडी लाईट प्रतिबंध व ट्रॉलिंग मासेमारीचे नियमाच्या आदेशाचे

उल्लंघन करणाऱ्या नौकांवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन (सुधारणा) अधिनियम, २०२१ अंतर्गत खटले दाखल करण्यात येत असल्यामुळे पारंपारिक मच्छिमारांचे हितसंबंध जोपासले जात आहे व मासेमारी प्रयत्नांचे व्यवस्थापनाव्दारे मत्स्यसाठयाचे जतन करण्यात येवून शाश्वत मत्स्योत्पादनात राखले जात आहे.

राज्याच्या जलधी क्षेत्रात प्रामुख्याने रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हयाच्या सागरी क्षेत्रात परराज्यातील नौकाव्दारे घुसखोरी करून मासेमारी केल्याचे तसेच अनधिकृत साहित्य वापरून व एलईडी प्रकाशझोतांची दिवे वापरून मासेमारी करत असल्याचे निदर्शनास येत असते. परराज्यातील अतिवेगवान मासेमारी नौकांचा पाठलाग करून त्यांना पकडण्यासाठी अतिवेगवान गस्ती नौका भाडेपट्टीने घेण्यासाठी शासन मान्यता प्राप्त झालेली असून त्यानुसार अतिवेगवान गस्ती नौका भाडेपट्टीने घेण्याबाबतची ई निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली असून निविदेस प्राप्त झालेल्या प्रतिसादानुसार रत्नागिरी जिल्हयाकरिता अतिवेगवान गस्ती नौका भाडेपट्टीने उपलब्ध करून घेण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

---०००---

लक्षवेधी सुचना क्र.१२१९

महाराष्ट्र विधानसभेचे सन २०२३ चे पहीले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री.निलेश लंके , वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र. १२१९ पुढीलप्रमाणे आहे -

" माहे जानेवारी, २०२३ च्या शेवटच्या आठवडयात वा त्या सुमारास, नाशिक शहरातील म्हसरुळ शिवारातील ज्ञानदीप गुरुकुल आधाराश्रमात वय वर्षे चौदा व त्याखालील १३ ते १५ वयोगटातील आदिवासी तालुक्यातील गावपाडयावरील अल्पवयीन मुलींना द किंग फाऊंडेशन संस्थेद्वारे ज्ञानदीप गुरुकुल आधाराश्रम हर्षल बाळकृष्ण मोरे संचलित यामधील सर्व मुलींना सत्संगाच्या नावाखाली वारंवार वीर गावात नेऊन त्यांचे अंघोळ करतानाचे व्हिडीओ शूट करुन त्यांना ब्लॅकमेल करून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात येत असल्याच्या तक्रारी एका पिडीत मुलीने केल्यानंतर, पोलीसांनी अन्य मुलींच्या घेतलेल्या जाबजबाबात सर्वच मुलींनी या घटना आपल्याबाबत घडल्याचे दिलेल्या जबाबात कबूल करणे, मुलींच्या फिर्यादीनुसार पोलीसांनी बलात्कार, बालकांचे लैंगिक अपराधा पासून संरक्षण, अनुसूचीत जाती-जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम नुसार गुन्हा दाखल करणे, सदर प्रकरणी यापूर्वीही या आश्रमात वास्तव्यास असलेल्या मुलींनी सदर हर्षल बाळकृष्ण मोरे याचेकडून लैंगिक अत्याचार करण्यात येत असल्याबद्दल केलेल्या तक्रारीची दखल घेतली न गेल्यामुळे हर्षल मोरे याचे धैर्य व धारिष्ट्य वाढीस लागणे, या प्रकारामुळे राज्यातील आदिवासी मुलींचा व त्यांच्या पालकांचा आधाराश्रम व आश्रम शाळांवरील उडालेला विश्वास, व शासनाच्या संथगतीने होणाऱ्या कारभाराविरोधात निर्माण झालेली तीव्र चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

मा. डॉ. विजयकुमार गावित, मंत्री, आदिवासी विकास यांचे निवेदन

१. नाशिक महानगर पालिका कार्यक्षेत्रातील म्हसरुळ पोलीस स्टेशन हद्दीतील नारायण नगर, म्हसरुळ, नाशिक येथील एका रो-हाऊस मध्ये द किंग फाऊंडेशन, ज्ञानदिप गुरुकुल आधार आश्रम या नावाने बेकायदेशिरपणे विनापरवानगी आश्रम चालविण्यात येत होता. धर्मादाय आयुक्त, नाशिक यांचेकडे झालेल्या नोंदणीनुसार हा आश्रम हर्षल बाळकृष्ण मोरे उर्फ सोनू वय-३२ वर्षे व्यवसाय-खाजगी नोकरी याच्या मार्फत स्थापन झाला असून आदिवासी बालक / बालिका निवासासाठी वापर करण्यांत येत होता.

२. द किंग फाऊंडेशन संचलित ज्ञानदिप गुरुकुल आश्रम या ठिकाणी असलेल्या रो-हाऊसमध्ये मुलींसाठी १ हॉल, १ स्वयंपाकगृह व १ खोली तसेच मुलांसाठी २ हॉल, १ किचन, १ खोली अशी निवासव्यवस्था आहे. झोपण्यासाठी गादी, चादर उपलब्ध असून भोजन व्यवस्था संस्थेमार्फत करण्यात आली होती.

३. आदिवासी समाजाचे असल्याने तुम्हाला मुलांचे पुढील शिक्षणाचा फायदा होईल, असे सांगुन हर्षल मोरे याने नाशिक जिल्हयातील पेठ तालुक्यातील बोरदा, गांगोडपाडा, गोळसपाडा, खोकरविहिर, हनुमंतपाडा , डेरापाड़ा, विराने, बेलशेत या गावातील १५ आदिवासी मुली व १४ आदिवासी मुले आश्रमात आणले होते. सदर मुले व मुली इयत्ता २ री ते ११ वी या वर्गात शिकत असुन प्रणित विद्यालय, आठवले जोशी बालविकास मंदिर म्हसरुळ, नाशिक या शाळेत प्रवेशित होते.

४. द किंग फाऊंडेशन संचलित ज्ञानदिप गुरुकुल आश्रम या वसतिगृहातील प्रवेशाच्या वेळी प्रत्येकी ६,०००/- (अक्षरी रक्कम रुपये सहा हजार मात्र) घेण्यात आले असल्याचे एका मुलाने सांगितले. या आश्रमात निवासासाठी असणारी १४ वर्ष १० महिने वयाची वारली समाजाची बालिका, मुळ निवासस्थान मु.बोरदा, पो. सुरगाणे (उंबरपाडा) ता. पेठ, जि. नाशिक हिने दिनांक २४.११.२०२२ रोजी म्हसरूळ पोलिस स्टेशन, नाशिक येथे दिलेल्या फिर्यादीनुसार हर्षल बाळकृष्ण मोरे विरुद्ध भा.दं.वि. कलम ३७६, ३७६ (२) (फ) (आय)(ग), ३७६ (क)(अ) नुसार लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ चे ४, ६, ८, १०, १२, अनुसचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ चे कलम ३ (ब) (१) (२) प्रमाणे अत्याचाराचा गुन्हा दाखल झाला आहे.

५. दिनांक २४.११.२०२२ रोजी सायंकाळी या आश्रमात निवासासाठी असलेल्या १४ मुले व १५ मुली असे एकुण २९ बालकांना सुरक्षिततेच्या दृष्टिने तात्पुरत्या निवासासाठी म्हसरूळ पोलिस स्टेशन, नाशिक येथून एकलव्य निवासी शाळा पेठरोड, नाशिक येथे स्थलांतरीत करण्यांत आले होते· वरील गुन्हयाच्या अनुषंगाने या आश्रमात प्रवेश घेतलेल्या व नाशिक शहरातील विविध शाळांमध्ये वेगवेगळ्या इयत्तामध्ये शिक्षण घेत असलेल्या बालिकांची काळजी व संरक्षणाच्या दृष्टीने तात्पुरत्या स्वरूपात मुलींचे बालगृह, उंटवाडी रोड नाशिक येथे दिनांक २६.११.२०२२ रोजी दाखल करण्यात आले होते.बालकांना पालकांच्या ताब्यात देवुन नंतर नजीकच्या शासकीय आश्रमशाळेत दाखल करण्यात आले होते.

६. आधाराश्रमामधील मुलांपैकी ७ मुले व ११ मुली यांना शासकीय आश्रमशाळा,बाडगी,ता.पेठ,जि.नाशिक येथे प्रवेश देण्यात आलेला आहे.२ मुलींना आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह पेठ,ता.पेठ,जि.नाशिक येथे प्रवेश देण्यात आलेला आहे.

७. आधाराश्रमामधील मुलांपैकी ४ मुले व २ मुलींना शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा , आंबुपाडा (बे) ,ता.सुरगाणा,जि.नाशिक येथे प्रवेश देण्यात आलेला आहे. उर्वरित ३ विद्यार्थी समाजकल्याण विभागांतर्गत आहेत.

---

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन
लक्षवेधी सूचना क्र. ५९९

श्रीमती नमिता मुंदडा, मा. वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ५९९ पुढीलप्रमाणे आहे.

---

"स्वामी रामानंद तीर्थ शासकीय ग्रामीण वैद्यकीयमहाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई, जि. बीड. येथे 'थेलेसिमिया' या रुग्णांना लागणारी उपचार सुविधा व सदर आजारावर उपचारा संबधी लागणारे ब्लड, औषधी, गोळ्या या सुविधा मिळत नसणे, त्यामुळे सदर रुग्णालयात उपचार घेणाऱ्या थेलेसिनिया आजाराच्या रुगानासाठी एकूण ०६ प्रकारच्या सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी रुग्णांच्या पालकामधून करण्यात येत असणे, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

---

मा. मंत्री (वै.शि.) यांचे निवेदन

स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय रुग्णालयामध्ये एकुण ८५ थॅलेसेमिया आजाराचे रुग्ण उपचार घेत असून त्यापैकी ५७ रुग्ण १२ वर्षाखालीलू असून त्याचा उपचार बालरुग्ण विभागातील स्वतंत्र कक्षात केला जातो व उर्वरीत २८ रुग्ण १२ वर्षावरील असून त्यांचे उपचार रुग्णालयातील औषधवैद्यकशास्त्र विभागात केले जातात.

बालरोग विभागात उपचार घेणाऱ्या थॅलेसेमिया रुग्णांसाठी ०१ वरिष्ठ निवासी डॉक्टर व ०१ सहाय्यक अध्यापक यांची नियुक्ती करण्यांत आलेली असून, बालरोग विभागातील थॅलेसेमिया रुग्णांची तपासणी दर बुधवारी विभागातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांच्याद्वारे केली जाते. तसेच सद्यस्थितीत थॅलेसेमिया रुग्णांना हाफकिन महामंडळाकडून प्राप्त झालेल्या डेफेरासिरॉक्स गोळया देण्यांत येतात. उपचारात बदल करावयाचे झाल्यास केंद्रीय औषध नियंत्रण संस्था, मुंबई (CDSCO WEST ZONE MUMBAI) व अन्न व औषध प्रशासन (FDA) यांच्या मानकांनुसार रक्तकेंद्राचा आराखडा हा नियोजित असल्याकारणाने या आराखडयात कोणतेही बदल करण्यासाठी CDSCO व FDA यांची पूर्वपरवानगी असणे आवश्यक आहे.

बालरोग विभागात उपचार घेणाऱ्या थॅलेसेमिया रुग्णांना महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ देण्यांत येऊन १ दिवसांत रुग्णांना सुट्टी देण्यांत येते. परंतु ज्या रुग्णांच्या भरतीच्या वेळी रक्ताचे प्रमाण खूप कमी असते अशा रुग्णांना उपचारासाठी ०२ वेळा ब्लड ट्रान्सफ्युजनची आवश्यकता असल्यामुळे त्यांना ०२ दिवसांत सुट्टी देण्यात येते.

बालरोग विभागात उपचार घेणाऱ्या थॅलेसेमिया रुग्णांना भरती झाल्यानंतर रुग्णांचे रक्त तात्काळ क्रॉस मॅचिंगसाठी ब्लड बँकेत पाठविण्यांत येते व २४ तासात आंतरुग्णांना सुट्टी देण्यांत येते. तसेच, अतिआवश्यक थॅलेसेमिया रुग्णांकरीता सकाळच्या सत्रातही रक्तपुरवठा केला जातो.

*********************************************

## लक्षवेधी सूचना

श्रीमती नमिता मुंदडा, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १३४८ पुढीलप्रमाणे आहे:-

"उमरी (ता. केज, जि. बीड) येथील जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या कामात अभियांत्रिकी सल्लगार असलेल्या मे. संतोष शामसुंदर पडुळे या कंत्राटदाराला दि. २२/०४/२०२२ रोजी जिल्हा परिषद, बीड यांचेकडून कार्यारंभ आदेश देण्यात आला असणे, परंतु सदर काम हे ३० ते ३५% अपुर्ण असतांना सर्व अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने दि. ०७/०९/२०२२ रोजी सदर कंत्राटदाराला संपूर्ण बील अदा करण्यात आले असणे, सदरील ठेकेदाराने सदर कामाचे सर्व अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने अनुभव प्रमाणपत्र जिल्ह्यातील प्रत्येक ई-निविदेमध्ये सादर केलेले असल्याचे उघड होणे, तसेच सदर कंत्राटदाराच्या बनकरंजा, ता. केज. येथील कामाच्या तांत्रिक तपासणी मध्ये गंभीर बाबी उघड होणे, सदर कामात मे. संतोष शामसुंदर पडुळे या कंत्राटदाराने पाईप अंदाजपत्रकाप्रमाणे न वापरता इतर निकृष्ट दर्ज्याचे वापरून शासनाची फसवणूक केल्याचे उघड होणे, त्यामुळे अपहाराची रक्कम निश्चित करून कंत्राटदारावर गुन्हे दाखल करण्याचे अपर जिल्हाधिकारी यांच्या अहवालात प्रस्तावित करण्यात आले असणे, परंतु मे. संतोष शामसुंदर पडुळे या एजन्सीने जलजीवनच्या कामात अनियमितता व भ्रष्टाचार केल्याचे उघड होऊनही अद्याप गुन्हे दाखल करून कार्यवाही करण्यात आली नसणे, सदर कंत्राटदाराला आर्थिक क्षमता नसतानाही मोठ्याप्रमाणात नियमबाह्यकामे देण्यात आली असणे, त्यामुळे मे. संतोष शामसुंदर पडुळे या एजन्सीची आर्थिक गुन्हे शाखेकडून चौकशी करून वरील प्रकरणी तातडीने गुन्हे दाखल करण्याची आवश्यकता" यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

## मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे निवेदन

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत मौ-उमरी, ता. केज नळ पाणी पुरवठा योजनेच्या कामाची ई-निविदा प्रक्रिया राबवून स्पर्धात्मकरित्या ई-निविदा समितीमार्फत पात्र/अपात्र तपासणी करून रितसर सर्वात कमी दराने संबंधित ठेकेदार श्री. संतोष शामसुंदर पडुळे व जे. व्ही. शशीकांत कोठुळे, बीड यांच्या संयुक्त नावे रक्कम रु. १९५.८० लक्ष रक्कमेचे काम अंदाजपत्रकीय दराने १८ महिने मुदतीत काम करण्यासाठी कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत.

तद्नंतर ठेकेदाराने काम सुरु करण्यासाठी उप अभियंता, परळी यांचेमार्फत तांत्रिक पर्यवेक्षणाखाली काम सुरु करून ठेकेदाराने केलेल्या कामाचे मुल्यांकन कामाची तांत्रिक तपासणी करून रितसर निविदा रक्कम रु. १९५.८० लक्ष पैकी रु. १६७.४७ लक्ष इतक्या रक्कमेचे देयक दिनांक ०९/१२/२०२२ रोजी ठेकेदारास अदा करण्यात आलेले आहे.

सदर कामाची त्रयस्थ तांत्रिक तपासणी मे. टाटा कन्सल्टंसी कंपनीने केलेली आहे. सदरची तपासणी करुन दिनांक ०६/०९/२०२२ रोजी मे. टाटा कन्सल्टंसी कंपनीने अहवाल दिलेला आहे. त्रयस्थ तपासणी अंती काढण्यात आलेल्या त्रुटींची पुर्तता ठेकेदाराकडून करून घेवून काम गुणवत्तापुर्वक झालेची खात्री करून देयक अदा करण्यात आलेले आहे.

मौजे-उमरी, ता. केज येथील कामाच्या ठेकेदाराने भौतिकदृष्ट्या पुर्ण कामाचे अनुभव प्रमाणपत्र देणेबाबत मागणी केल्यानुसार झालेल्या कामाची तपासणी करून अनुभव प्रमाणपत्र जिल्हा परिषदेमार्फत देण्यात आलेले आहे. सदर अनुभव प्रमाणपत्राच्या आधारे संबंधित ठेकेदार श्री. संतोष शामसुंदर पडुळे यांनी दिलेल्या अनुभव

प्रमाणपत्राद्वारे २४ कामाच्या ई-निविदेत भाग नोंदविलेला आहे. त्यापैकी त्यांचे ७ ठिकाणचे कामाचे स्पर्धात्मक दर कमी आल्याने ते एल-१ ठरत असल्याने कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत.

उप आयुक्त (विकास), औरंगाबाद यांचे चौकशी अहवालात सुचविल्याप्रमाणे नळ पाणी पुरवठा योजना बनकारंजा ता. केज या योजनेच्या कामाच्या बाबलीत दिनांक ०७.०१.२०२३ नुसार जिल्हा जलसंधारण अधिकारी जिल्हा परिषद (ल.पा.) बीड यांची चौकशी अधिकारी म्हणुन नेमणुक करण्यात आली होती. सदरच्य आदेशाच्या अनुषंगाने जिल्हा जल संधारण अधिकारी यांनी चौकशी करून दिनांक २४.०१.२०२३ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांना अहवाल सादर केलेला आहे. सदरील प्राप्त झालेल्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, परळी यांना पोलीस गुन्हा नोंद करणेसाठी प्राधिकृत करण्यात आलेले होते. परंतु, संबंधित उप अभियंता हे वैद्यकीय रजेवर गेल्याने प्रकरणी गुन्हा नोंद होऊ शकला नाही. तद्नंतर सदरील प्रकरणी पोलीस गुन्हा नोंद करणेसाठी विस्तार अधिकारी, पंचायत समिती, केज यांना प्राधिकृत करण्यात आलेले होते. तथापि, दरम्यानच्या काळात नळ पाणी पुरवठा योजना बनकारंजा, ता. केज या योजनेच्या ठेकेदार यांनी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र. २१२४/२०२३ नुसार दाद मागितलेली आहे. त्यानुसार मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी योजनेचे ठेकेदार संतोष शामसुंदर पडुळे यांनी टाटा कंन्स्लटंसी या कंपनीने योजनेचे केलेले त्रयस्थ तांत्रिक तपासणी अहवालाचे अवलोकन करून असे आदेशीत केले की, पुढील आदेशापर्यंत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी योजनेचे ठेकेदार यांचेविरुध्द कोणत्याही फौजदारी कार्यवाही करु नये तसेच सदरील प्रकरणी पुढील सुनावणी दिनांक १२.०४.२०२३ रोजी ठेवण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत, सदरील प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

श्री. संतोष शामसुंदर पडुळे यांनी सनदी लेखापाल यांनी प्रमाणीत केलेले आर्थिक क्षमतेचे प्रमाणपत्रानुसार (Bid Capacity) ई-निविदा समितीच्या मान्यतेने सदर कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत.

*********************

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन**

**श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सुचना क्रमांक १०९४ पुढील प्रमाणे आहे :-**

"राज्यामध्ये मोठ-मोठे उद्योगधंदे निर्माण असणे, त्यामुळे मुंबई बंदरातील गोदी विभागात, किराणा सामान- कागद- लोखंड- पोलाद - कापड - भाजीपाला इ वस्तू साठविल्या जाणाऱ्या गोदामात तसेच वाहतूक, जहाज, रेल्वे इ. ठिकाणी ओझी उचलणे, सामान चढवणे व उतरवणे तसेच रचून ठेवणे यासाठी मोठ्या प्रमाणात माथाडी कामगार काम करीत असणे, परंतू मालक वर्गाकडून माथाडी कामगारांना योग्य वेतन व इतर राहण्या- खाण्याची सुविधा न देता उलट अपमानास्पद वागणूक मिळत असणे, त्यामुळे माथाडी कामगारांना न्याय देण्यासाठी कै.अण्णासाहेब पाटील यांनी माथाडी कामगार व मुंबई मधील इतर बाजारपेठांमधील संबंधीत नेत्यांना एकत्र करून वेळप्रसंगी संप पुकारून शासनाकडे पाठपुरावा करणे, त्यामुळे सन १९६९ मध्ये अखेर माथाडी कामगारांच्या न्याय हक्कासाठी महाराष्ट्र राज्याच्या दोन्ही सभागृहात 'महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरी नियमन व कल्याण) अधिनियम १९६९ अन्वये' कायदा पारित करण्यात येणे, त्यानुसार माथाडी कामगारांच्या हितासाठी कामगार विभागाकडे सन १९९० पर्यंत कै.अण्णासाहेब पाटील यांची एकमेव माथाडी कामगार संघटना अस्तित्वात असणे, मात्र त्यानंतर इतर नवीन तीन संघटना तयार होणे, सद्यस्थितीमध्ये राज्यात माथाडी शब्दाचा वापर करून १५० माथाडी संघटना कार्यरत असून यातील चार संघटना वगळता इतर संघटना बोगस असल्याचा आरोप नोंदीत असलेल्या संघटनांनी केलेला असणे, अद्यापपर्यंत मुंबईत ११ बोर्डात एक लाख माथाडी कामगार आहेत, तर इतर ७० हजार कामगार हे विविध संघटनांच्या नावाने सदस्यत्व घेतलेले असणे, माथाडी कामगारांच्या युनियनच्या बोगस नोंदीमुळे शहरी भागातील काही टपोरीगिरी व उनाडक्या करणारी मुले या माथाडी संघटनांमध्ये सहभागी होत असून आपला एक म्होरक्या निवडून त्याला माथाडी संघटनेचे अध्यक्षपद दिले जात असणे, मेहनत करून, लोकांची ओझी वाहून, गोण्या उचलणाऱ्या माथाडी कामगारांऐवजी ही टपोरी मुले काहीही काम न करता व्यापारी, बांधकाम व्यावसायिक तसेच अन्य लोकांकडून दादागिरी व गुंडगिरी करून पैसे वसुली करीत असणे, तसेच या बोगस संघटना आपल्या बॅनरवर राजकिय नेत्यांचे फोटो टाकून शहरभर लावत असल्यामुळे या सर्व बोगस संघटनाना राजकिय पक्षांचा आर्शिवाद आहे कि काय? असा प्रश्न सर्वसामान्य व्यापाऱ्यांच्या मनामध्ये निर्माण झालेला असणे, या बोगस संघटनांच्या गुंड प्रवृत्तीमुळे सर्व व्यापारी व बिल्डर पोलिसांकडे तक्रारही करीत नाहीत किंवा तक्रार आल्यास पोलिस जाणिवपुर्वक त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे चित्र राज्यातील शहरी भागांमध्ये दिसून येणे, अश्या बोगस माथाडी संघटनाना आवर घालण्यासाठी राज्य शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

---

**मा. मंत्री (कामगार) यांचे निवेदन**

महाराष्ट्रातील विविध बाजारपेठा, कृषीउत्पन्न बाजार समित्या, माल वाहतुकीच्या गाड्या, रेल्वे मालधक्के, गोदामे अशा विविध ठिकाणी मालाची चढ-उतार करणारे कामगार काम करीत होते. या माथाडी कामगारांचे काम नैमित्तिक असल्यामुळे व ते कोणत्याही मालकाचे कामगार नसल्यामुळे त्यांना कामगारांचे विविध लाभ मिळत नव्हते. त्यास अनुसरुन बृहन्मुंबईतील माथाडी कामगारांच्या परीस्थितीचा अभ्यास करुन

योग्य त्या उपाययोजना सुचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी समित्या स्थापन करुन या विषयाचा अभ्यास करण्यात आला.

समितींच्या शिफारशी व तत्कालिन परिस्थितीचा विचारविनिमय करुन महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजिवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ हा कायदा मंजूर करण्यात आला. त्यामध्ये या कामगारांच्या कल्याणासाठी नियमन करण्यात आलेले आहे.

त्यानुसार प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी मंडळनिहाय योजना गठीत करण्यात आल्या. सदर कामगारांना या योजनांचा लाभ घेण्यासाठी विविध माथाडी मंडळात नोंदीत करण्यास सुरुवात करण्यात आली. सुरुवातीच्या कालावधीत २ ते ३ कामगार संघटना कार्यरत होत्या. कालांतराने जसजशी माथाडी मंडळांच्या कामाची व्याप्ती आणि नोंदीत कामगारांची संख्या वाढत गेली तसतसे स्थानिक स्तरावर कामगार संघटना अस्तित्वात येऊ लागल्या. सद्यस्थितीत सुमारे ५०४ माथाडी संघटना माथाडी कामगारांचे प्रतिनिधीत्व करत आहेत.

संघटनांना मान्यता व तत्सम बाबींच्या अनुषंगाने पुणे परीसरातील औद्योगिक वसाहतीत यापूर्वी तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यास अनुसरुन वेळोवेळी बैठका घेऊन उपाययोजना करण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करण्यात आलेले आहेत.

कामगार संघटना या श्रमिक संघ अधिनियम, १९२६ अंतर्गत नोंदणीकृत होतात. सदर कायद्याच्या कलम २१ अ नुसार एखादी व्यक्ती अपात्र ठरल्यास, मा. न्यायालयाने दोषी ठरवले असल्यास त्याला पदाधिकारी म्हणून काम पाहता येत नाही. तसेच त्यांना कामगार संघटनेचा पदाधिकारी म्हणून नोंदीत करुन घेण्यात येत नाही. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या चारित्र्य पडताळणी बाबतचा दाखला विशेष कार्यकारी अधिकारी अथवा इतर लोक प्रतिनिधी यांचेकडून प्रमाणित करुन सादर केला जातो. कामगार संघटना अथवा पदाधिकारी यांचेबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास माथाडी मंडळांमार्फत योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येते. कामाच्या ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून विशिष्ट परिस्थिती उद्भवल्यास संबंधित माथाडी मंडळांमार्फत हस्तक्षेप करण्यात येऊन पोलिसांना तात्काळ कळविण्यात येते.

माथाडी कायद्याची परीणामकारक अंमलबजावणी करुन त्यातील तरतूदींचा दुरुपयोग रोखण्यासाठी दिनांक ०६.०९.२०१६ च्या शासन निर्णयान्वये कृती आराखडा निश्चित करण्यात आलेला आहे. या शासन निर्णयान्वये जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली कृती समिती स्थापन करण्यात आली आहे. याबाबत दिनांक २७.०२.२०२३ रोजी शासन स्तरावर सर्वकष बैठक संपन्न झालेली असून त्यामध्ये क्षेत्रीय कार्यालयांना माथाडी योजनांची अंमलबजावणी प्रभावी होण्याच्या दृष्टीकोनातून तसेच माथाडी कार्यक्षेत्रातील गुंड प्रवृती व बोगस प्रकरणांच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. तसेच या बैठकीत माथाडी मंडळे व पोलिस विभागांना योग्य त्या तपासण्या करुन कायदेशीर कारवाई त्वरीत करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तक्रारी प्राप्त झाल्यानंतर पोलिसांमार्फत आवश्यकतेनुसार गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच औद्योगिक कंपन्या, व्यापारी व आय.टी. कंपन्या यांच्या तक्रारींची तात्काळ दखल घेण्याकरिता परिमंडळ पोलिस उपायुक्त यांची नोडल अधिकारी म्हणून गृह विभागांतर्गत नेमणूक करण्यात आलेली आहे.

*******

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. १४५४**

**डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. छगन भुजबळ, श्री. रोहित पवार, श्री. अनिल पाटील मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १४५४ पुढीलप्रमाणे आहे: -**

" राज्यात पेट्रोल, डिझेल आणि गॅसचे दर गगनाला भिडत असतांनाच पेट्रोल पंपांवर हेराफेरीचा प्रकार राजरोसपणे सुरु असल्याची गंभीर बाब दि. २२ फेब्रुवारी, २०२३ रोजी निदर्शनास आलेली असणे, वाहनांमध्ये इंधन भरण्यासाठी मशिनवर ठराविक रक्कम टाकल्यानंतर केवळ मशिनवरील काटे फिरत असणे मात्र वाहनांमध्ये इंधन कमी प्रमाणात भरले जात असल्याची धक्कादायक बाब अलिकडील काळात वारंवार उघडकीस आलेली असणे, गॅसपंपावर कमी दाबाने पुरवठा केला जात असतांनाच किंमत मात्र जादा वसुल केली जात असणे, पेट्रोल, डिझेल व गॅस पंपचालक, व्यवस्थापक, सुपरवायझर व कर्मचारी यांच्या संगनमताने सुरु असलेला प्रचंड आर्थिक गैरव्यवहार, राज्यभरात ग्राहकांची कोट्यावधी रुपयांची फसवणूक केली जात असणे, शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून मात्र वेळोवेळी तपासण्या केल्या जात नसल्याने या टोळयांचे फावलले असणे, यामध्ये विविध ठिकाणी रॅकेट कार्यरत असून शासकीय यंत्रणांच्या संगनमताने राजरोसपणे ग्राहकांची आर्थिक फसवणूक केली जात असणे, त्यास वरिष्ठांचे मिळत असलेले गैरवाजवी संरक्षण, यासंदर्भात उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन कडक कारवाई करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील वाहनचालकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, वाहनचालकांची प्रचंड आर्थिक लूट होत असतांनाही शासनाकडून त्यास पायबंद घातला जात नसणे, सदरबाबत लवकरात लवकर निर्णय घेऊन त्याची त्वरेने अंमलबजावणी करण्यासंदर्भात प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होत असल्याने, सदर गंभीर प्रकरणी शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया, "

---

### मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे निवेदन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अखत्यारित झालेल्या वैध मापन शास्त्र यंत्रणेकडून वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ व त्याअंतर्गत तयार केलेल्या विविध नियमांची अंमलबजावणी केली जाते. ग्राहकांना वस्तू देतांना अप्रमाणित वजन व मापांचा वापर करणे. घोषित मात्रेपेक्षा कमी मात्रेमध्ये वस्तू देणे, छापिल एम.आर.पी.पेक्षा अधिक

किंमत आकारणे इत्यादी बाबी सदर अधिनियमानुसार गुन्हा आहे. ग्राहक हिताची जपणूक करण्यासाठी वैध मापन शास्त्र यंत्रणेमार्फत नियमित तपासण्या करण्यात येत असून नियमांचा भंग करणा-या दोषी आस्थापनांविरुध्द कारवाई करण्यात येते.

राष्ट्रीय ग्राहक तक्रार क्रमांकावर तसेच नियंत्रक, वैध मापन शास्त्र कार्यालयाकडे किरकोळ पेट्रोल / डिझेल विक्रीत अनियमितता आढळून येत असल्याबाबत तसेच आवेष्टित दुध किरकोळ विक्रेत्यांकडून छापील किंमतीपेक्षा अधिक दराने विक्री होत असल्याबाबतच्या तक्रारींमध्ये वाढ होत असल्याचे आढळून आले होते. त्याअनुषंगाने नियंत्रक, वैध मापन शास्त्र यांनी दिनांक १ फेब्रुवारी, २०२३ रोजी च्या पत्रान्वये ग्राहक तक्रारींचे वाढते प्रमाण लक्षात घेता, ग्राहक हितार्थ संपूर्ण राज्यामध्ये दि. ०२/०२/२०२३ ते ०८/०२/२०२३ या कालावधी दरम्यान पेट्रोल / डिझेल पंप तसेच दूध विक्रेते यांचेसंदर्भात तपासणी मोहिम राबवून नियमांचे उल्लंघन करणा-या दोषी आस्थापनांवर वैध मापन अधिनियम, २००९ तसेच त्या अंतर्गत आवेष्टित वस्तू नियम, २०११ अन्वये योग्य ती कार्यवाही करण्याबाबतचे आदेश दिले होते.

वैध मापन शास्त्र यंत्रणेने राबविलेल्या उपरोक्त मोहिमेअंतर्गत संपूर्ण राज्यामध्ये पेट्रोल पंप तपासणीची मोहिम राबविण्यात आली. सदर मोहिमेत ५७९ तपासण्या करण्यात आल्या असून माल कमी देणेबाबत ५ खटले दाखल करण्यात आले आहेत. तसेच विहित मुदतीत पेट्रोल पंप युनिट फेरपडताळणी व मुद्रांकन न करणे याबाबत १७ खटले दाखल करण्यात आले आहेत. तसेच २४ पंप युनिट नोझलबाबत संबंधित पेट्रोल पंपाला नोटीस देऊन नोझल युनिट बंद केले आहेत. सदर मोहिमेमध्ये एकूण ११ खटल्यांचे प्रशमन (Compounding) करण्यात आले असून संबंधितांकडून नियमानुसार दंड वसूल करण्यात आला आहे.

***********